
# छात्र प्रबोधन

सौर पौष शके १९१९
वर्ष ६ अंक ६




ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी अभिनव मासिक!


तंबूतील शिबिरे १९९७

ॐ

इवली शल्ये रुपती खुपती,
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख लेऊनी
ने ज्योतिर्जगतात।

**संपादक, प्रकाशक**
महेंद्र सेठिया
**संपादक मंडळ**
महेन्द्र सेठिया B.E.,M.Ed
विवेक पोंक्षे M.Sc.,B.Ed
अनघा लवळेकर M.A.,B.Ed
शैलजा देशमुख M.A.,M.Ed
**मुखपृष्ठ व आतील चित्रे**
भास्कर सगर
**मुखपृष्ठ व आतील छायाचित्रे**
श्री. विजय देसाई
**अक्षर जुळणी**
प्रिंट लिंक, पुणे
**संपर्क पत्ता**
**'छात्र प्रबोधन'**
ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०
☎ ०२१२-४७७६९१, ४७८०९५
**प्रकाशन दिनांक**
राष्ट्रीय सौर ११ पौष, शके १९१९
1 जानेवारी १९९८
**वर्गणी**
**भारतात**
**वार्षिक**-रु. १२५/- **द्वैवार्षिक**-रु. २४०/-
**त्रैवार्षिक**-रु.३५०/- **आजीवन**-रु. २०००/-
**भारताबाहेर - वार्षिक** ३० डॉलर

वर्ष ६ अंक ६
सौर पौष
शके १९१९

छात्र
# प्रबोधन

## अंतरंग

| | |
|---|---|
| २ | **संवाद** |
| ३ | **स्वातंत्र्ययुद्धातील आगळे पर्व : नेताजी :** स्वाती ढेकणे |
| ७ | **कथा : चोमाची डबरी :** संक्षिप्त कथा रुपांतर: मीना वांगीकर |
| ११ | **विज्ञान आणि अभियांत्रिकी :** प्रा. मधुकर गोगटे |
| १३ | **पियुषचा वाढदिवस :** श्री. विवेक घळसासी |
| १६ | **अभ्यासातील स्वावलंबन-'लेखन' भाग १ :** प्रा. विवेक पोंक्षे |
| १९ | **एकांकिका-माऊलीच्या मायेची कथा:** श्री. दत्ता श्री. टोळ |
| २३ | **चला प्रतापगडावर :** चि. गौरव होंळाबी |
| २६ | **तंबूतील शिबिरे :** अजेय शेलार, श्रद्धा तीर्थळी |
| २९ | **मानवी यानाची मंगळावर झेप :** डॉ. प्रकाश तुपे |
| ३२ | **उपक्रम व स्थानिक पत्ते** |

### एप्रिल-मे ९८ मधील नेतृत्व शिबिराला यायचय का?
### तर मग हा गृहपाठ करायला सांगा.

१) कोणत्याही वस्तूंची विक्री करून त्यात रु. १०/- नफा मिळवा.
२) एका सामान्य व्यक्तीची व एका अधिकारी व्यक्तीची कोणत्याही सामाजिक प्रश्नांशी निगडीत एक-एक मुलाखत घ्या व ती लिहून काढा.
३) कोणतेही एक चरित्र वाचून त्यावर ३ मि. भाषणाची तयारी करा व ३-४ पाने त्यासंबंधी थोडक्यात वर्णन करा.

हे गृहपाठ पूर्ण करतील अशांनाच नेतृत्व प्रशिक्षण शिबिरामध्ये सहभागी होता येईल. हे शिबिर इ. ८ वी ते महाविद्यालयीन गटापर्यंतच्या मुलामुलींसाठी स्वतंत्र असेल. सविस्तर माहिती पुढील अंकामध्ये ...

## जानेवारी महिन्यातील कार्यक्रम

जानेवारी : २६ जानेवारी, प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने **'स्वतंत्र भारतात परकीय लिपीत स्वाक्षरी का?'** हा प्रश्न घेऊन विद्यार्थ्यांशी चर्चा करावी, बोलावे. त्यांना या मागची भूमिका समजावून सांगावी. इंग्रजी भाषेबद्दल राग नसून मानसिक गुलामगिरी घालविण्यासाठी, छोट्या-छोट्या कृतिंमधून **राष्ट्राभिमान, आमची अस्मिता व्यक्त व्हावी यासाठी** भारतीय लिपीत स्वाक्षरी करण्याचा आग्रह! स्वाक्षरी म्हणजे स्वत:ची ओळख, मग ती परकीय लिपीत का? यासंबंधी चर्चा घ्यावी. विद्यार्थ्यांनी गावातील विविध व्यक्तींना भेटून यासंदर्भात चर्चा करावी.

या निमित्ताने **'देवनागरीतून स्वाक्षरी करा' ही स्पर्धा घ्यावी.** अलंकारिक, वळणदार स्वाक्षऱ्यांना बक्षीसे द्यावीत. गावातील विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींचे संदेश व देवनागरी स्वाक्षरी मिळवून ती शाळांशाळांमध्ये काचफलकावर लावावी. विद्यार्थ्यांनी व मोठ्यांनीही ध्वजवंदनानंतर जाहीरपणे अशी शपथ घ्यावी.

**जानेवारी मधील छात्र प्रबोधनच्या सभासदांचे व पालकांचे मेळावे १० डोंबिवली, ११ बोरिवली १२ वसई, १३ मुलुंड, १४ पार्ले, १८ अकोला, २० अमरावती, २१ धानोरे, कारंजा लाड, मंगरूळपीर, २३ कराड, २५ सांगली, २६ इचलकरंजी, २७ विटा, २८ सातारा. मेळाव्याच्या तपशिलासाठी स्थानिक कार्यालयांशी अथवा वितरण केंद्रांशी (वितरण केंद्रांची यादी व पत्ते, वर्ष ६ अंक ३ मध्ये आहे.) संपर्क साधावा.**

## संवाद

*प्रिय प्रबोधक मित्रमैत्रिणींनो,*

*जरा धावपळीतच संवाद लिहितोय. लागोपाठचे दौरे अन् सध्या चालू असलेले 'संयोजक प्रशिक्षण शिबिर'(गावोगावच्या विद्यार्थ्यांसाठी मेळावे-शिबिरे घेऊ इच्छिणारे १८ गावांमधील ३५ सदस्य या शिबिरात उपस्थित आहेत.) यामुळे फुरसत काढणं अवघड गेलं, अन् म्हणूनच संवाद लिहायलाही उशीर झाला, असो. तुम्हा सर्वांची स्नेह-संमेलने छान पार पडली असतील किंवा येत्या महिन्यात ती होतील. एकूणातच हिवाळा अन् हा काळ आपल्या सगळ्यांचाच विलक्षण उत्साहाचा असतो, असायला हवा...*

*१२ जानेवारी हा दिवस आपल्या सगळ्यांनाच माहितीचा असणार! कारण तो **'युवक दिन'** आहे. **स्वामी विवेकानंदांचा तो जन्मदिन.** ज्ञान प्रबोधिनीच्या कार्याची उभारणी स्वामी विवेकानंदांच्या चिंतनावर - त्यांनी मांडलेल्या तत्त्वज्ञानावर आधारित असल्याने, प्रबोधिनीत या दिवसाला विशेष महत्त्व आहे. १०० वर्षांपूर्वी स्वामीजींनी मांडलेले विचार आजही तितकेच प्रेरणादायी, विचार करायला व त्याप्रमाणे आचरण करायला लावणारे आहेत.*

*स्वामी विवेकानंद आपल्या सर्व विद्यार्थी-तरुणांना उद्देशून म्हणतात, ''तुम्ही जर खरंच माझी मुले असाल तर तुम्ही कशालाही घाबरणार नाहीत. कोणत्याही अडथळ्यांमुळे थबकून जाणार नाहीत. तुम्ही सिंहासारखे असाल! एखादे काम पूर्ण करण्यासाठी आगीत जरी उडी घ्यावी लागली तरी माझी मुले तशी उडी घ्यायला कायम तयार असतील.'' स्वामीजींच्या अपेक्षा आपण समजून घेऊन त्या पूर्ण करायला प्रारंभ तर करूया. आपण कशाकशाला घाबरतो? त्यापैकी एक दोन गोष्टींची भीती येत्या वर्षात आपण कमी करू शकू का? असा संकल्प येत्या १२ जानेवारीला, स्वामी विवेकानंदंचे स्मरण करून आपण सर्वजण करूयात.*

*संक्रांतीनिमित्त सर्वांनीच **'तिळगूळ खावा अन् गोड बोलावे'.** आवर्जून अनेकांकडे जाऊन तिळगूळ द्यावा-घ्यावा. मैत्री आपुलकीची नाती घट्ट करणारे हे प्रसंग तिळगूळ देण्याघेण्यापुरते औपचारिक राहू नयेत. एकमेकांमधील अबोला दूर करण्यासाठी, खारट-तूरट-आंबट-कडू अनुभव विसरून जाऊन पुन्हा एकदा नव्या जोमाने स्नेहाचे धागे पक्के करण्यासाठी या संक्रांतीचा उपयोग करूयात.*

***नववर्षाच्या शुभेच्छा नेहमीप्रमाणेच गुढीपाडव्याला !***

*इ. ९ वी व ११ वीच्या प्रबोधक मित्र-मैत्रिणींना खास आवाहन... १० वी १२वी च्या 'व्हेकेशन' बॅचमध्ये स्वत: अडकवून घेण्यापूर्वी थोडा विचार करा. खरंच आपली बुद्धी इतकी लुळी-पांगळी आहे का? की तिला 'क्लास' नावाचा पांगुळगाडा असल्याशिवाय ती चालणारच नाही! याबाबतच्या तुमच्या प्रतिक्रियाही जरूर कळवा.*

*१० वी -१२ वी च्या सभासदांना मनसोक्त अभ्यासासाठी उन् उर्वरित सर्वांना मनसोक्त व्यायामासाठी शुभेच्छा!*

सस्नेह तुमचा

(महेंद्र सेठिया)



# स्वातंत्र्य लढ्यातील आगळे पर्व – नेताजी

– स्वाती ढेकणे

वयाच्या दहाव्या वर्षी आपल्या मामांबरोबर कलकत्त्याला गेलेल्या सुभाषचंद्रांना मामांनी कौतुकाने विचारले, ''सुभाष तू कलकत्ता पाहण्यासाठी कटकहून आलास, आवडीचा खाऊ, खेळणी, गमतीच्या गोष्टी हे सर्व मी तुला देणारच आहे; पण आणखी काही हवे असेल तर सांग.'' यावर सुभाष मामांना म्हणाला, ''मला काही नको, मला फक्त सुशिलकुमार सेन या शूर विद्यार्थ्याचे दर्शन घडवा. इंग्रज सार्जंटला लोळवणारा आणि 'वंदे मातरम्' चा जयघोष केल्याबद्दल निर्दय इंग्रजांचे फटके खात असतानाही मातृभूमीचा जयजयकार करणारा पंधरा वर्षांचा तो सुशीलकुमार सेन मला दाखवा!'' कोवळ्या वयातल्या सुभाषचंद्रांच्या आवडी, निवडी, ओढी अशा होत्या. काय म्हणावे या हट्टाला!

नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जन्म ओरिसा प्रांतातील कटक येथे २३ जानेवारी १८९७ या दिवशी झाला. वडील जानकीनाथ बोस हे नामवंत वकील होते. हे वृत्तीने, प्रज्ञेने आणि विचाराने स्वतंत्र होते. इंग्रजांची अरेरावी असह्य झाल्यामुळे त्यांनी सरकारी वकीलाची जागा सोडून दिली होती. 'राय बहादूर' हा किताब अभिमानपूर्वक अव्हेरला होता. वडिलांचा हाच स्वाभिमान सुभाषबाबूंच्या जीवनात आणि वर्तनात सदैव आढळून आला. सुभाषबाबूंची आई प्रभातवीदेवी एक आदर्श माता होती. रामकृष्णांची उपासक होती. आपला सुभाष 'रामकृष्ण–विवेकानंद' या दैवतांच्या चरणी सुखरूप राहील असे तिला स्वाभाविकपणे वाटत असे. अशा या थोर मातापित्यांच्या आचार विचारातून सुभाषबाबूंचे सोन्यासारखे दीप्तिमान व्यक्तिमत्त्व घडले.

शिक्षणाच्या निमित्ताने सुभाषबाबूंनी टाकलेले पहिले पाऊल पडले ते बॅप्टिस्ट मिशनने चालवलेल्या इंग्रजी शाळेत. बंगालमध्ये असणाऱ्या शाळेत बंगाली भाषेवर बहिष्कार घालण्यात आला. इंग्रजांचे कौतुक, इंग्रजीचा पुरस्कार आणि भारतीय भाषा व संस्कृती यांचा तिरस्कार जाणीवपूर्वक केला जात होता. शाळेतील बंगाली मुले मधल्या सुटीत कावरीबावरी होऊन एका बाजूला बसत असत. पण सुभाष बोस हा विद्यार्थी मात्रा याला अपवाद होता! सुभाष बोस यास आंग्ल मुले पाण्यात पाहू लागली. शाळाप्रमुखांकडे वारंवार तक्रारी करू लागली. सुभाषचे उत्तर ठरलेले असे; 'मी न्यायाला सोडून वागणार नाही. आणि अन्यायही सहन करणार नाही.' शेवटी ही नित्याची हुज्जत नको म्हणून सुभाषचंद्राने ती शाळा सोडली. १९०९ मध्ये त्यांनी रेव्हनशॉ कॉलेजिएट स्कूलमध्ये प्रवेश केला. ही शाळा वेगळी होती. या शाळेत दुसऱ्या भाषेचा दुस्वास केला जात नसे. याच शाळेत सुभाषला वेणीमाधव दास हे उत्तम शिक्षक लाभले. विद्यार्थ्यांची उमलती मने संस्कारित करण्याची विलक्षण शक्ती या शिक्षकाच्या अंगी होती. या ऋषितुल्य शिक्षकाने सुभाषचंद्रांवर अभिजात संस्कार केले.

कटक येथेच १९१३ मध्ये सर्व विश्वविद्यालयातून दूसरा क्रमांक मिळवून ते मॅट्रिक इंटरमध्ये असतानाच असतानाच सुभाषचंद्रांच्या अंत:करणात मोक्ष प्राप्त करून घेण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली. त्यासाठी त्यांनी बनारस, गया आदि क्षेत्रांतील अनेक महंतांच्या आयुष्याचे जवळून निरीक्षण केले. परंतु गुरू मिळाला नाही. अखेरीस त्यांनी घरचा रस्ता धरला.

१९१५ मध्ये इंटरमिजिएटमध्ये प्रथम श्रेणीचे यश त्यांनी संपादन केले. त्यानंतर त्यांनी कटक सोडून कलकत्त्यास प्रेसिडेन्सी कॉजेलात प्रवेश घेतला. त्यांच्यासारख्या बुद्धिमान, राष्ट्राभिमानी व स्वतंत्रप्रज्ञ विद्यार्थ्याला कलकत्त्याचे वातावरण आवडले. 'प्रत्येक भारतीय तरुणाने मिळेल तेवढे लष्करी शिक्षण घेतले पाहिजे.' असा दूरदर्शी विचार त्यांच्या मनात घोळत असे.

या प्रसिडेन्सी कॉलेजात भारतीय

विद्यार्थ्यांना धारेवर धरणारे प्राध्यापक ओॲटन हे शीघ्रकोपी म्हणून विख्यात होते. ते भारतीय विद्यार्थ्यांविषयी तुच्छतेने बोलत असत. अशा या उद्दाम प्राध्यापकाला धडा शिकवायच्या हेतूने विद्यार्थ्यांनी त्यांना बदडून काढले. स्वत: सुभाषबाबूंनी मारहाणीत भाग घेतला नसला तरी त्यामागे त्यांचाच हात आहे; असा प्राचार्यांनी निष्कर्ष काढून सुभाषबाबूंना कॉलेजातून बडतर्फ करण्यात आले. काही काळानंतर त्यांनी दुसऱ्या कॉलेजात प्रवेश घेतला व त्या महाविद्यालयातील यू.टी.सी. पथकात प्रवेश घेऊन त्यांनी सैनिकी शिक्षणाचे धडे घेण्यास सुरुवात केली.

१९१९ साली ''तत्त्वज्ञान'' हा विषय घेऊन ते पहिल्या वर्गात बी. ए. झाले. त्याच वर्षी त्यांना वडिलांनी आय. सी. एस्. होण्यासाठी इंग्लंडला पाठवले. ''भारतीय विद्यार्थी गुणवत्तेत कमी पडतात; असे इंग्लिश लोक मानतात. ही अपमानकारक गोष्ट पुसून टाकण्याचे आव्हान तुझ्यासमोर आहे.'' हे मित्रांचे उद्‌गार ऐकताच युयुत्सू वृत्तीचे सुभाषबाबू इंग्लंडला जाण्यास तयार झाले. ऑगस्ट १९२० मध्ये सुभाषबाबू आय.सी.एस. परीक्षा चौथ्या क्रमांकाने पास झाले. नंतर त्यांनी केंब्रीज विद्यापीठाची 'मानसशास्त्र व नीतिशास्त्र' या विषयाची डिग्री मिळवली. सुभाषबाबू इंग्लंडला असताना त्या सुमारास लो. टिळक इंग्लंडला आले होते. ''इंग्लंडमध्ये शिकणाऱ्या भारतीय तरुणांनी सरकारी नोकरीत न जाता साधी राहणी ठेवून आपल्या देशाची सेवा करावी.'' या लोकमान्यांच्या भाषणाचा सुभाषचंद्रांवर खोल परिणाम झाला. मातृभूमीच्या सेवेचे व्रत घेतलेले सुभाषबाबू आपले परमोच्च ध्येय विसरले नाहीत. ''भव्य, उत्कट, उदात्त असे ध्येयवादी जीवन कंठणे हे जीविताचे खरे सार्थक आहे.'' असा दीर्घ विचार करून हे सतीचे वाण पत्करण्याचा त्यांनी निश्चय केला.

इंग्लंडमध्ये असतानाच जालियानवाला हत्याकांडाच्या वार्तेने सुभाषबाबूंचे मन क्रुद्ध झाले. ''ब्रिटिश सरकार व माझ्या देशाची सेवा एकाच वेळी करता येणे मला अशक्य आहे. म्हणून मी आय. सी.एस. चा राजीनामा देत आहे. मी यापुढे स्वातंत्र्य लढ्यात भाग घेणार आहे.'' असे निश्चयी स्वरात सुभाषबाबूंनी सांगितले.

सुभाषबाबू अत्यंत स्वाभिमानी होते. हे त्यांच्या प्रत्येक गोष्टीतील वागण्यावरून दिसून येत होते. मातृभूमीवरील प्रेमाने प्रेरित झालेले, जाज्वल्य देशाभिमान असणारे सुभाषबाबू १६ जुलै १९२१ रोजी भारतात परतल्यावर देशबंधू दास यांची त्यांनी भेट घेतली. सुभाषबाबू दासांच्या विचारांशी समरस झाले. सुभाषबाबूंची तीक्ष्ण बुद्धिमत्ता व त्यांचे संघटनकौशल्य या गुणांमुळे ते दासबाबूंचे पट्टशिष्य बनले. १९२२ साली देशबंधुंनी ''स्वराज्य पक्ष'' स्थापन केला. त्या पक्षाचा प्रचार करण्यासाठी ''फॉर्वर्ड'' नावाचे साप्ताहिक काढले. त्याचे संपादक सुभाषबाबू होते.

पारतंत्र्याचे होणारे संस्कार नाहीसे करून विद्यालयात स्वातंत्र्याची आकांक्षा निर्माण करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय शिक्षणाचे महत्त्व मोठे होते. या उद्देशाने देशबंधू दासांनी ''नॅशनल कॉलेज''ची स्थापना कलकत्त्यात केली व सुभाषबाबूंची त्या विद्यालयाच्या प्राचार्यपदी नेमणूक केली. ''जे कार्य करावयाचे ते अंत:करण ओतून करावयाचे.'' या सुभाषबाबूंच्या स्वभाव वैशिष्ट्यामुळे कॉलेजच्या प्राचार्यपदाचे कामही त्यांनी तसेच केले. त्यांना ज्ञानापेक्षा देशभक्ति विद्यार्थ्यांना शिकवायची होती. अशा तेजस्वी कर्तृत्ववान प्राचार्यावर इंग्रजांचे लक्ष नसते तर नवलच!

१९२९ च्या डिसेंबरमध्ये पं. नेहरु यांच्या अध्यक्षतेखाली लाहोरला काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. यावेळी संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करणारा ठराव मंजूर करण्यात आला. हे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता देशात आपण प्रतिसरकार स्थापन केले पहिजे, असा ठराव सुभाषबाबूंनी केला. पण मवाळ वृत्तीच्या काँग्रेस नेतृत्वाशी आपले फार काळ जमण्यासारखे नाही हे सुभाषबाबूंना कळून चुकले. त्यामुळे ''इंडियन इंडिपेडन्स लीग'' मार्फत युवक परिषदा घेऊन तरुणांना स्वातंत्र्य आंदोलनाकडे आकर्षित करण्याचा कार्यक्रम हाती घेण्याचे त्यांनी ठरविले.

''स्वातंत्र्याची आकांक्षा ही जीवनातील इतर सर्व आकांक्षांची जन्मदात्री आहे. एकदा का माणूस स्वातंत्र्याकांक्षेने भारून गेला की त्याच्या जीवनाकडे पाहण्याचा सारा दृष्टिकोनच बदलून जातो. वसंतऋतू येताच जसं निसर्गाचं रूप बदलून जातं तसच मानवी मनाचंही आहे. स्वातंत्र्य कांक्षेने पेटून उठलेल्या तरुणाचं

व्यक्तिमत्त्व एक नवं रूप धारण करतं आणि तो इतका सामर्थ्यसंपन्न होतो की त्याचं त्याला आश्चर्य वाटू लागतं.'' स्वातंत्र्यकांक्षा केवळ स्वातंत्र्यापुरतीच मर्यादित असता कामा नये असे सांगून सुभाषबाबू वारंवार सांगत असत की, ''राजकीय, सामाजिक, आर्थिक, शारीरिक आणि सांस्कृतिक असे युवक आंदोलनाचे पाच भाग मानले पाहिजेत. आपल्या देशााची सर्व तऱ्हेच्या बंधनातून मुक्तता करण्यासाठी तरुणांनी पुढे आले पाहिजे. केवळ राजकीय स्वातंत्र्य मिळून माझं समाधान होणार नाही. आर्थिक विषमता, जातीजातीतील विद्वेष, धार्मिक सहिष्णुता या सर्व अपप्रवृत्तींविरूद्ध आपल्याला झगडलं पाहिजे. माझं हे बोलणं कदाचित प्रौढांना समजणार नाही. मी स्वप्नरंजनात दंग झालो काय असे ते म्हणतील; पण मला काय अभिप्रेत आहे हे तरूण मनाला चटकन समजू शकेल.'' असे सांगून त्यांनी पुन्हा एकदा युवक आंदोलनाची आपली कल्पना विशद केली होती.

१९३० च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत सुभाषबाबूंना अटक करण्यात आली. गांधी–आयर्विन करारानंतर अनेक देशभक्तांबरोबर सुभाषबाबूंनाही मुक्त करण्यात आले. याच वर्षी १९३१ मधे ते कलकत्त्याचे महापौर झाले. यावेळी सुभाषबाबूंनी मित्राला पत्र लिहिले. त्यातून त्यांचा दुर्दम्य आशावाद व आत्मविश्वास प्रत्ययाला आल्यावाचून राहात नाही. ''गुलाबाचा सुवास घ्यायची इच्छा बाळगणाराने काट्याचाही स्वीकार करण्याची तयारी ठेवली पाहिजे. उषादेवतेचे प्रसन्न हास्य पहायचे असेल तर रात्रीचा अंध:कार सहन केला पाहिजे. त्याग आणि कष्ट हीच स्वातंत्र्याची किंमत असते.''

''स्वातंत्र्य मिळविण्याकरिता भारताने सशस्त्र क्रांती केली पाहिजे.'' असे ठाम मत सुभाषबाबूंनी विठ्ठलभाई पटेलांजवळ व्यक्त केले होते. जणू तरूण हिंदुस्थानचे मन त्यांच्यामधून बोलत होते. आयुष्यात ११ वेळा कारावास भोगणारे सुभाषचंद्र हे तावून, सुलाखून निघालेले देशभक्त होते, भूमिपुत्र होते. कारागृहात असताना सुभाषबाबूंची प्रकृति वारंवार बिघडू लागली. तेव्हा इंग्रजांनी हद्दपारीची नोटीस बजावली. ''उपचारासाठी युरोपात जाऊन राहणार असाल तर कारागृहात ठेवणार नाही.'' सुभाषचंद्रांनी ही इंग्रज सरकारची अट नाकारली. परंतु त्यांनी परदेशी जाण्याचे ठरवले. १९३३ ते १९३६ या तीन वर्षात औषधोपचाराच्या निमित्ताने सुभाषबाबू ऑस्ट्रियातील व्हिएन्ना या गावी राहिले. या काळात युरोपिय राजकीय परिस्थितीचा अभ्यास केला. हिटलर, मुसोलिनी, डी. व्हॅलेरा यांच्या गाठीभेटी घेतल्या. भारताच्या भविष्यकालीन स्वातंत्र्ययुद्धात कोणाचे किती सहकार्य लाभेल याचा अंदाज घेतला. ''इंडियन स्ट्रगल'' हा ग्रंथ लिहून 'भारताचे भावी स्वरूप कसे असले पाहिजे' यासंबंधीचे विचार या ग्रंथात मांडले आहेत. याचवेळी त्यांना सचिव म्हणून लाभलेल्या श्रीमती एमिली शँकेल या कालांतराने सौ. बोस झाल्या.

१९३८ च्या हरिपुरा येथील कॉंग्रेसच्या अधिवेशनाचे अध्यक्षपद सुभाषबाबूंनी भूषविले. पुढच्याच वर्षी १९३९ मध्ये त्रिपुरा येथे भरणाऱ्या कॉंग्रेस अधिवेशनाचे अध्यक्षपदही त्यांच्याकडे चालून आले. या निवडणुकीत सुभाषबाबूंनी कॉंग्रेसच्या क्षितीजावरचे ढग पाहिले; आणि त्यापेक्षा देशसेवेचे आकाश मोठे मानून पक्षत्याग केला. त्यानंतर देशभर संचार करून आपल्या प्रागतिक पक्षाचे तत्त्वज्ञान ते लोकांना समजावून देऊ लागले. फेब्रुवारी १९४० मध्ये दिल्ली येथे भरलेल्या आखिल भारतीय विद्यार्थी संघटनेच्या अधिवेशनात सुभाषबाबू म्हणाले, ''आपण आकाश पातळ एक करूया. देशातून व देशाबाहेरून स्वातंत्र्यासाठी लढा देऊया.''

२२ जून १९४० रोजी एक तरूण स्वातंत्र्यवीर सावरकरांना येऊन भेटला. सावरकरांनी त्याला ''तुरुंगात कुजत पडण्यापेक्षा परदेशी पलायन करून; इटली, जर्मनी यांनी पकडलेल्या भारतीय सैनिकांची मदत घेऊन; बाहेरून भारतावर स्वारी करून; स्वातंत्र्य संपादन करण्याचा प्रयत्न कर.'' असा धाडसी सल्ला दिला. तो तरूण म्हणजेच आपले ''नेताजी'' होत.

१६ जानेवारी १९४१ रोजी पठाणी वेश करून 'झियाउद्दिन पठाण' असे नाव धारण करून ते नजरकैदेतून निसटले. ते पेशावरला गेले. तेथून काबूलमार्गे ते जर्मनीत बर्लिनला पोहोचले. २८ मार्च १९४१ रोजी बर्लिन रेडिओवरून त्यांनी भारतीय लोकांना उद्देशून स्वातंत्र्यलढ्याचे

आवाहन करणारे भाषण केले. ते ऐकून भारतीय थक्क झालेच पण इंग्रज सरकार देखील! सुभाषबाबूंनी हिटलरची भेट घेतली. जर्मनीने सुभाषबाबूंना संपूर्ण साहाय्य देण्याचे मान्य केले. प्रचार, फौज उभी करण्यासाठी कर्जाऊ रक्कम दिली. ती परत कधीच मागितली नाही. जर्मनीने ब्रिटीश सैन्यातील कैद केलेले भारतीय सैनिक सुभाषचंद्रांच्या ताब्यात दिले. त्यांनी आझाद हिंद फौजेत येण्याचे आवाहन केले. भारतीय सैनिकांपुढे केलेल्या भाषणात सुभाषबाबू म्हणाले, ''आपली सर्वांची मातृभूमि आज स्वातंत्र्यासाठी झगडत आहे. कारण स्वातंत्र्याशिवाय जगणेच यापुढे तिला अशक्य आहे. परंतु स्वातंत्र्य हे आत्मयज्ञाने मिळते. शक्तीचा, संपत्तीचा नव्हे तुमच्या सारसर्वस्वाचाहि होम स्वातंत्र्यासाठी करावा लागतो. पूर्वीच्या सर्व क्रांतिकारकांप्रमाणे तुम्हीही आपल्या सौख्याचा, चैनीचा, पैशाचा, मालमत्तेचा त्याग केला पाहिजे. तुम्ही काय दिलेत म्हणजे स्वतंत्रतादेवीचे समाधान होईल ते मी सांगतो.''

''आज तिला नुसते शूर सैनिक नकोत तर स्वत:चे रक्त देणारे, आत्मयज्ञास सदैव सिद्ध असलेले असे बंडखोर स्त्रीपुरुष तिला पाहिजे आहेत. मात्र त्यांनी हे लक्षात ठेवावे की, त्यांना मृत्यूस मिठी मारावी लागणार आहे; आणि एवढेच नव्हे तर स्वत:च्या शरीरातून निघालेल्या रक्ताच्या सागरात शत्रूला खेचून बुडवायचे आहे म्हणून मी तुम्हाला एवढेच सांगतो –

**''तुम मुझे खून दो मैं तुम्हे आझादी दूँगा।''**

या नेताजींच्या आवाहनाला सैनिक प्राणांची बाजी लावण्यास तयार झाले.

याच सुमारास जपानमध्ये सुप्रसिद्ध क्रांतीकारक रासबिहारी बोस यांनी स्थापन केलेली 'आझाद हिंद फौज' सुभाषचंद्रांच्या हाती दिली. आझाद हिंद फौजेसाठी सुभाषचंद्रांना लोकांनी ओंजळ भरभरून पैसा दिला. जपाननेही सुभाषबाबूंना सर्व मदत दिली.

सुभाषबाबू ब्रिटिशांच्या बाजूने लढणाऱ्या भारतीय सैनिकांना सांगत, ''जर्मनी, जपान यांच्याशी न लढता त्यांना शरण या व आझाद हिंद फौजेत सामील व्हा.'' सैनिक भराभर शरण येत होते व आझाद हिंद फौज वाढू लागली. १९४३ साली स्त्रियांची एक पलटण उभारली ज्याचे नेतृत्त्व कॅ. लक्ष्मी यांनी केले. २१ ऑक्टोबर १९४३ रोजी सिंगापूर येथे सुभाषचंद्रांनी ''आझाद हिंद सरकारची'' स्थापना केली. जपानने अंदमान–निकोबार बेटे नव्या सरकारकडे सुपूर्त केली. १८ ऑगस्ट १९४४ रोजी आझाद हिंद फौजेने भारताच्या सीमेवर इंफाळनजिक पहिले पाऊल टाकले. स्वतंत्र भारताचा व्याघ्रचिन्हांकित ध्वज फडकावला.

'जयहिंद, चलो दिल्ली' या घोषणांनी आकाश दुमदुमले. रंगून अकाशवणीवरून सुभाषबाबूंनी देशबांधवांना संदेश दिला. ''तुम्ही ऊठा, लढा, झगडा, बंड करा. देशाच्या सरहद्दीवर आपण भेटूया. भारतमातेचे पूजन करूया. देशाचे निशाण लावूया.'' ६ जुलै १९४४ या दिवशी आझाद हिंद रेडिओवरून त्यांनी म. गांधींना उद्देशून भाषण केले. ते म्हणाले, ''Father of Our Nation! In this holy war of India's liberation we ask for your blessings and good wishes.'' पण युद्धाचे पारडे फिरले! दैवाचे फासे उलटले. जपानचा पराभव झाला. जर्मनी जपान दोस्त राष्ट्रांना शरण गेल्याने सुभाषबाबूंचा स्वातंत्र्याचा प्रयत्न फसला. ते विमानाने फोर्मोसला गेले. तेथून ते टोकियोला येत असताना आकाशात विमानाचा स्फोट झाला. या अपघातात भाजलेल्या सुभाषबाबूंना तैहोकु येथील लष्करी रूग्णालयात हलविण्यात आले. पण १८ ऑगस्ट १९४५ रोजी त्यांचा दु:खद अंत झाला.

त्यांच्या मृत्युविषयी व मृत्युच्या कारणाविषयी अनेक शंका व्यक्त केल्या गेल्या. इतिहासाने त्याविषयी मौन पत्करले असले तरी त्यांच्या अनमोल कार्याची स्मृती भारतीयांच्या मनात कायमची ठसून राहिली.

मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी अवघ्या आयुष्याचा क्षण न् क्षण व्यतीत करणाऱ्या या स्वातंत्रसेनानीचे स्मरण भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षी आणि नेताजींच्या जन्मशताब्दी निमित्ताने प्रत्येक भारतीयाने करायला हवे.

●●


**स्वाती ढेकणे**
वायरलेस कॉलनी , औंध पुणे ७.

# चोमाची डबरी

**मूळ कादंबरी : डॉ. शिवराम कारंत** **रूपांतर : मीना वांगीकर**

डोळे फाडून पाहिले तरी काहीही दिसत नव्हते इतका गुडूप अंधार होता. घनदाट जंगलाजवळ असले तरी पानांची सळसळ नाही, कोणत्याही आवाजाची चाहूल नाही. अशा या गावचे नाव आहे 'मोगनहळ्ळी'. गाव कसले? शे-दोनशे डोकी असलेली वाडीच म्हणा ना! अचानक ती भयाण शांतता चिरत, तिला छिन्नविछिन्न करून टाकणारा एक विचित्र ध्वनी ऐकू येतोय ''ढम् ढम्... ढक् ढक्... ढम् ढम्... ढक् ढक्.'' छोट्या डबक्यासारख्या या गावात, हा आवाज एका टेकडीवरून दुसऱ्या टेकडीवर आपटत एकाचे दोन, दोनाचे चार होत, कानावर आदळतोय. मूळ ध्वनी व प्रतिध्वनी एकमेकात बेमालूमपणे मिसळून शेजारच्या जंगलभर निनादत आहे. शेजारच्या गावच्या जत्रेतून उशीरा परतणारे लोक हा आवाज ऐकून एकदम दचकतात. 'अरे, ही तर आपल्या चोमाची डबरी' म्हणत सारे हसले. संकप्पय्या, त्या गावचे जमीनदार, पटकन् म्हणाले, ''अरं, शंकराच्या हाती जसा डमरू तशी चोमाच्या हाती डबरी रे! हा धरमराज कोणत्या मुहूर्तावर जनमलना होता, देवाला ठाव. याला दिवस-रात सारखीच, बारसं-बारावंही सारखचं ढोसायची, अन् बडवायची डबरी.''

चोमा हा जातीने महार आहे. मोगनहळ्ळीच्या रानाच्या कडेला त्याचा महारवाडा म्हणजे एकुलती एक झोपडी नव्हे खोपटचं आहे. त्यात सोमा, त्याची पाच मुलं, एक काळा कुत्रा नि खोडं राहात. चोमाला त्याचे वय विचारले तर 'काय की राव' हेच उत्तर मिळते. तो सांगतो त्या आठवणींवरून त्याचे वय पंचावन्न



**डॉ. शिवराम कारंत**

***ज्ञानपीठ पारितोषिक मिळविणारे प्रसिद्ध कन्नड लेखक डॉ. शिवराम कारंत यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या निधनाने कन्नड साहित्यामधे मोठी पोकळी निर्माण झाली आहे. डॉ. कारंत यांना कर्नाटकात कादंबरीकार म्हणून तर प्रसिद्धी मिळालीच, पण इतर अनेक गुणांनीही त्यांचे व्यक्तिमत्त्व समृद्ध होते. कर्नाटकातील दक्षिण कन्नड जिल्ह्यातील 'कोट' या लहानश्या खेड्यात त्यांचा जन्म झाला. घरची सांपत्तिक स्थिती चांगली असल्यामुळे त्यांचे बालपण सुखात गेले. निसर्ग निरीक्षण हा त्यांचा बालपणीचा आवडता छंद. त्यामुळेच निसर्गाबद्दल त्यांच्या मनात आपुलकी होती.***

***कॉलेज जीवनात, इंग्रजी व कन्नड साहित्याच्या वाचनाने ते प्रभावित झाले. याच सुमारास गांधीजींच्या विचारांनी प्रभावित होऊन स्वातंत्र्य चळवळीतही त्यांनी भाग घेतला. यक्षगानातील अद्भूत दृश्ये व कर्नाटक संगीत यांनी प्रभावित झालेल्या डॉ. कारंतांनी, याच दोन्हींचा वापर करून नवीन नाटके लिहिली व सादर केली. संगीत नाटकांऐवजी त्यांनी गद्य नाटके लिहिली. त्यांच्या यक्षगानावरील 'यक्षगान बयलाट' या पुस्तकाला १९५८ मध्ये साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले.***

***डॉ. कारंत यांनी लहान मुलांसाठी अनेक शैक्षणिक प्रयोग केले. मुलांचे शालेय जीवन आनंदी व्हायला पाहिजे, त्यासाठी त्यांना एका जागी जखडून ठेवणाऱ्या पद्धतीत बदल व्हायला पाहिजे, असे त्यांना वाटे. यासाठी त्यांनी शिक्षकांची शिबिरे घेऊन त्यांना प्रशिक्षण दिले. मुलांची शिबिरे आयोजित केली. भाषेबद्दल त्यांनी पाठ्यपुस्तके लिहिली. कन्नड शब्दकोश तयार केला. मुलांना सर्व शास्त्रांचा परिचय करून देणारा 'बालप्रपंच' हा ज्ञानकोशही त्यांनी तीन खंडात प्रकाशित केला. चित्र, वास्तू, शिल्प या कला अनुभवण्यासाठी, पाहण्यासाठी त्यांनी भारतभर प्रवास केला. त्यावर त्यांनी प्रवासवर्णनेही लिहिली. त्यांचे विविध ग्रंथ, कादंबऱ्या यांमध्येही या प्रवासाचे पडसाद उमटलेले आढळतात.***

*आपल्या जीवनात डॉ. कारंत यांनी पंचेचाळीसहून अधिक कादंबऱ्या लिहिल्या. अस्पृश्यता, गरिबी, दारूचे दुष्परिणाम इ. विषयांवरील मानवी दु:खाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. अस्पृश्यता या विषयावरील 'चोमन दुडी' ही त्यांची अतिशय गाजलेली कादंबरी... या कादंबरीत कारंतांनी रचनात्मक कौशल्यापेक्षा प्रभावी कथानकाला प्राधान्य दिले आहे. अतोनात गरिबीतील हालअपेष्टा, रुढीप्रिय लोकांची उदासिनता, पैसा काय अनर्थ घडवू शकतो हे या कादंबरीत थोडक्यात पण फार समर्थपणे दाखवले आहे. हळवा असणारा व शेतकरी होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारा निराश व असहाय होऊन स्वत:ची डबरी बडवत मरून जाणारा चोमा हा दलितवर्गाचे सांकेतिक प्रतीक आहे. ही कादंबरी कन्नडमध्ये अतिशय गाजली व तिच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. वाचकाच्या काळजाला भिडणारा चोमा हा अमर झाला आहे. या कादंबरीवर आधारित चित्रपट देखील खूप लोकप्रिय झाला. १९७६ मधे या चित्रपटाच्या कथानकाला उत्तम कथानकाचे पारितोषिक मिळाले. चोमाचे काम करणारे नट श्री. वासुदेवराय यांना उत्तम अभिनयाचे पारितोषिक मिळाले. हा चित्रपट अतिशय परिणामकारकरित्या चित्रित झाला होता व त्यातील पात्रे चिरकाल स्मरणात राहिली आहेत. या कादंबरीचा मराठी अनुवाद सौ. हेमलता काकडे यांनी 'चोमा महार' या नावाने केला व कॉँटिनेंटल प्रकाशनातर्फे तो प्रकाशित झाला आहे. भाषेच्या बारकाव्यांसकट कादंबरी समर्थपणे अनुवादित झाली आहे. त्यामुळे मराठी वाचकाला चोमाची हृदयद्रावक कहाणी प्रत्यक्षात वाचायला मिळाली. चोमाची ही कथा छात्र प्रबोधनच्या वाचकांसाठी मीना वांगीकर यांनी संक्षिप्त रूपात मांडली आहे. डॉ. कारंत आज आपल्यात नाहीत, तरी त्यांचे साहित्य सर्वांना नेहमीच प्रेरणा देत राहील!*

---

असावे असा अंदाज करता येतो. त्याची महारीण बेतोबाच्या कोपाने खपल्याला पाच वर्षे झाली. मोठा मुलगा चनिया पंचविशीचा, त्याच्या पाठीवरचा गुरवा, मग बेळ्ळी, ही म्हणजे चोमाची जीव की प्राण, तिच्या पाठीवरचा आठ वर्षाचा काळू व मग निळू. फुलांच्या पाकळ्यांचं एकमेकात जेवढं सख्य असतं तेवढंच सख्य चोमाच्या कुटुंबियांमध्ये होते.

चोमा हा संकप्पय्यांचा वंशपरंपरागत महार. त्यांची चाकरी करायला तो बांधील होता, फायदा असो वा नसो तो ती सोडू शकत नव्हता. धनीसुद्धा चोमाला आश्रय नाकारू शकत नव्हते. दारिद्र्य व आजारपण चोमाच्या पाचवीलाच पुजलेले होते. घरचे सर्वजण दिवसभर धन्याकडे राबायचे. तांदूळ मिळायचे शेरभर अन् खाणारी तोंड मात्र सात. पाण्यासारखी पेज पिऊन ती कामाला लागायची. या तुटपुंज्या कमाईत चोमाचे नशापाणी पण भागायला हवे. थकल्याभागल्या जीवाला रोज दारू मिळायलाच हवी, नाहीतर 'व्यर्थ हे जीवन' असे चोमाला वाटे. दारू प्यालो नाही तर आपण मरू, अशी चोमाची खात्री होती. बिम्माच्या गुत्त्यावर पिऊन येऊन, हातात डबरी घेऊन, तो त्या तालात रमला व मुलं फेर धरून त्या तालावर नाचू लागली की, चोमाला तेच 'स्वर्गसुख' असे वाटे. स्वत: शेतकरी होण्याचे स्वप्न तो उराशी बाळगून होता. निदान खंडाने तरी जमीन घ्यावी व पीक काढावं.. म्हणून तो जंगलात सापडलेल्या वासरांना वाढवून बैलजोडी पोसत हाता. पण महारांना शेती करावयाची मुभा नव्हती. त्यांनी शेती केली तर जगाची उलथापालथ होईल असा समज होता.

एके दिवशी अचानक कॉफीच्या मळ्यावरचा मुकादम मन्वेल आला व त्याने चोमाला त्याच्या कर्जाची आठवण केली. चोमाची महारीण असताना तो त्या मळ्यावर मजुरीला जात होता. कॉफीच्या मळ्याचे कर्ज कधीच फिटायचे नाही. आधी हाती लागणार दिडकी, त्यात दारू, तेथला हिवताप, असलेले कर्ज चक्रवाढीने वाढतच जाणार. वीस रुपये कर्ज कसे फेडायचे? धन्याला कळले तर ते नाराज होतील.. 'बैल जोडी विकून टाक' बेळ्ळीने सुचविले. काळजातच घाव बसला अन् चोमा धाय मोकलून रडू लागला. बिचकत वाड्यावर जाऊन त्याने धन्याकडे खंडाने जमीन मागितली. आजवर अशी मागणी कुणा महाराने केली नव्हती. याची जगावेगळी मागणी ऐकून ते दचकलेच. त्यांनी आईला विचारले व म्हणाले, ''आजपोतर

आमच्या घराण्यात कोणीही महारांना जमीन दिली नाही. मी तरी कशी देणार?'' निराशेने चोमा दारूच्या व डबरीच्या तन्मयतेत सारं विसरू पाहात होता.

वय झाल्यामुळे चोमाला मळ्यावर नेण्यापेक्षा त्याच्या दोन्ही तरूण पोरांना मळ्यावर नेणे धूर्त मन्वेलने पसंत केले. ते आता लहान नाहीत, ''बाबा, पाठव की त्यांना मळ्यावर!'' बेळ्ळीही म्हणाली. नाईलाजाने मनाविरूद्ध चोमाने त्यांना मळ्यावर पाठवले. काही महिन्यातच हिवतापाने थोरला चनिया मेला. चोमाला मोठा धक्का बसला. त्या भागात महारांना नव्याने माहीत झालेल्या ख्रिश्चन्‌धर्माचे मोठे आकर्षण वाटू लागले होते. कारण त्या धर्मात जात-पात नव्हती. शेती करून ताठ मानाने जगता येत होते. दुसरा गुरवा ख्रिश्चन झाला व त्याने मेरी नावाच्या मुलीशी लग्न केले. हे ऐकून चोमा संतापला व त्याने मुलाशी संबंध तोडून टाकले.

या सर्व प्रकारात मळ्यावरचे कर्ज फिटलंच नाही. एके दिवशी यमदूतासारखा मन्वेल पुन्हा चोमासमोर दत्त म्हणून उभा राहिला. त्याचे तोंड पाहूनच चोमा अति संतापला. पण बेरड मन्वेलने कोणाला तरी मळ्यावर पाठवायला हवेच असा आग्रह धरला. बेळ्ळी जायला जागली अन चोमा हादरला. सोन्यासारख्या तरण्याताठ्या लेकीचे लग्न करून पाठवायचे का हे असे मळ्यावर धाडायचे? पण मन्वेलच्या हट्टापुढे कोणाचे काही चालले नाही. बेळ्ळीला मन्वेलबरोबर मळ्यावर जावेच लागेल. आपण हे करायलाच हवे असे तिलाही वाटले, पिढ्या न्‌ पिढ्याचे बापाचे कर्ज फिटत असेल तर आपण हे करायलाच हवे असे तिला वाटले. मन्वेलने तिला सुखात ठेवले होते. तेवढ्यात मळ्यावरच्या मोठ्या साहेबांची नजर बेळ्ळीवर पडली. त्यांनी तिला बंगल्यावर बोलावले. दुर्दैवाने बेळ्ळीला तेथे आपले सर्वस्व गमवावे लागले. हे सहन न होऊन मन्वेलने दिलेले पैसे व साहेबांची बक्षिशी असे पंधरा रुपये त्यांच्या हातावर ठेऊन बेळ्ळी गावी परतली. आपल्या भेकड मुलांना न जमलेले कर्ज चुकते करण्याचे काम बेळ्ळीने केले म्हणून चोमा खूप सुखावला. तिला कुठे ठेऊ न्‌ कुठे नको असे त्याला झाले. तो तिच्यासाठी चांगला नवरा शोधालया लागला. त्याच खुशीत त्याने पुन्हा एकदा धन्यापुढं जमिनीसाठी तोंड वेंगाडले. पुन्हा त्याच्या पदरी



निराशाच आली. तेवढ्यात आणखी एक अघटित घडते. पोहायला गेलेला निळू बुडून मेला. चोमाच्या दु:खाचा बांध फुटला. आता त्याला गुरवाची फार आठवण येते.

''आपणही का ख्रिश्चन होऊ नये; त्यामुळे तुझे आयुष्याचे स्वप्न खरे होईल;'' बेळ्ळीने चोमाला विचारले. लेकीच्या म्हणण्यात त्याला तथ्य वाटले. तसे झाले तर मन्वेलशी आपल्याला लग्न करता येईल असा विचार बेळ्ळीचा असतो. तो विवाहीत आहे हे त्या बिचारीच्या गावीही नव्हते. चोमा गुरवाला भेटायला निघाला व वेशीवर वेतोबाच्या पाया पडला. पण क्षणभर त्याला वेतोबाची भीती वाटली. आयुष्यभर ज्या देवाच्या पाया पडलो त्याला आता म्हातारपणी लाथाडायचे का? आपल्या नशिबी शेतकरी व्हायचे नसेल तर? हा देव आपला पिच्छा पुरवेल असे वाटून, घाबरून तो माघारी आला.

इकडे घरी पोहोचताच बेळ्ळी मन्वेलशी हसतखिदळत गप्पा मारताना पाहून तो हादरला. तिने मळ्यावरचे कर्ज इतक्या लवकर कसे फेडले हे कोडे चोमाला चटकन् उलगडले. तो फार संतापला. अंगफा संचारल्यासारखा त्याने तिला बाहेर खेचून झोपडीच्या बाहेर ढकलले. अन् बदड बदड बदडले. पण थोड्या वेळाने मात्र त्याला पश्चाताप झाला. आपण तरण्या ताठ्या पोरीला असे कसे पाठवले असे त्याला वाटले. चोमा संपूर्ण कोलमडला. आवेशाने त्याने बैलजोडी घेऊन चारवेळा धन्याचे शेत नांगरले. बैलजोडी जंगलात सोडून दिली. संतापाने नांगर तोडून मोडून जाळला आणि भान विसरून मोठमोठ्यांदा अक्राळ–विक्राळ हसू लागला. मग हातात डबरी घेऊन तो जीवाच्या आकांताने बडवू लागला.

बेळ्ळी अंगणातल्या झाडाखाली निपचित पडून हे सारे पाहात होती. डबरीचा आवाज ती तन्मयतेने ऐकू लागली. आजच्या वाजविण्यात काही वेगळाच जोम तिला जाणवला. आजतागायत डबरी तिच्या आठवणीत अशी कधीच वाजली नव्हती. आज प्रत्यक्ष रूद्रच संचारला होता जणू चोमाच्या अंगात! बेळ्ळीभोवती सारी सृष्टी गरागरा फिरू लागली. अखंड तांडवनृत्य चालले होते. डबरी निनादात होती. जणू प्रलयच येऊन ठेपला होता.

डबरी एकाएकी थांबली. बेळ्ळीच्या छातीत धस्स झालं. तिला बिलगून झोपलेल्या काळूला तिने दूर लोटलं अन् कसल्यातरी अनामिक भीतीने ती दाराकडे धावली. दोन्ही बैल दाराशी उभे होते. चोमाच्या पाठोपाठ ते आले असावेत. कुत्राही कान टवकारून दारापाशी उभा होता. त्याला ढकलून बेळ्ळी आत घुसली.

अंधुकशा उजेडात तिला चोमा दिसला. भिंतीला टेकून बसलेला. नि:स्तब्ध. अविचल. एका हाता डबरी अन् दुसरा हात वाजवण्यासाठी वर उचललेला! सारं काही जसंच्या तसं. एकंदर आवेशपूर्ण आविर्भाव नेहमीचा! पण आज डबरीदेखील पोरकी झाली होती!

●●

**मूळ कथा : डॉ. शिवराम कारंत**
**कथा रूपांतर : मीना वांगीकर**
सरस्वती, १२०४/२८, डेक्कन जिमखाना, पुणे ३०


# ज्ञान प्रबोधिनी प्रशाला

(दिल्लीच्या केंद्रीय शिक्षण मंडळाशी संलग्न इ. ५ वी ते १० वी मिश्र माध्यमाची शाळा)

**इयत्ता पाचवी प्रवेश चाचणी**
**(१९९८–९९)**

(इ. ४ थी पर्यंत मराठी/इंग्रजी माध्यमात शिक्षण घेत असलेले विद्यार्थी अर्ज करू शकतात.)

**प्रवेश चाचणी**
दि. १ मार्च १९९८ दु. ११ ते ३


**प्रवेश अर्ज**
दि.१ फेब्रुवारीपासून २० फेब्रुवारीपर्यंत प्रवेशद्वाराजवळ स्वागत कक्षात दु. ११ ते सायं ८ पर्यंत उपलब्ध

**प्रवेश अर्जाची किंमत :**
प्रत्यक्ष रू. ७०/–(पोस्टाने रू. ७५/–)
(वसतिगृहाची मर्यादित सोय फक्त मुलांसाठी)

**संपर्क : ज्ञान प्रबोधिनी**
५१० सदाशिव पेठ, पुणे ४११०३०
दूरभाष – ४७८०९५

# विज्ञान आणि अभियांत्रिकी

**मधुकर गोगटे**



अभियांत्रिकी म्हणजे इंजिनीयरींग. हा एक महत्त्वाचा अभ्यास व व्यवसाय आहे. इमारती, रस्ते, धरणे, पूल, बोगदे यांचा समावेश 'स्थापत्य अभियांत्रिकी' (सिव्हिल इंजिनियरिंग) मध्ये होतो. अभियांत्रिकीच्या अन्य कित्येक शाखा आहेत. उदाहरणार्थ, विद्युत अभियांत्रिकी (इलेक्ट्रिकल इंजिनीयरिंग) मध्ये विजेची निर्मिती, संक्रमण, विजेवर चालणारी यंत्रे यांचा समावेश होतो. रसायन अभियांत्रिकी (केमिकल इंजिनियरिंग) मध्ये रसायनांची निर्मिती, त्यांची ने-आण, त्यांचा साठा इत्यादींचा समावेश होतो.

अभियांत्रिकीच्या विविध शाखा एकमेकांशी निगडित आहेत. उदाहरणार्थ, स्थापत्य अभियांत्रिकीत लोखंडी बांधकामे गंजणार नाहीत याची दक्षता घ्यावी लागते. याउलट रसायन अभियांत्रिकीत विविध प्रक्रिया करण्यासाठी मोठ्या टाक्या लागतात. त्यांना आधार देण्यासाठी मजबूत बांधकामे लागतात.

अभियांत्रिकी हे विज्ञान व गणित यावर आधारलेले शास्त्र आहे. विविध प्रकारचे भार, तपमाने यांचा हिशेब करून एखाद्या बांधकामाचे घटक कोणत्या मापाचे असावेत, रासायनिक घटक कोणत्या मापाचे असावेत, रासायनिक टाकीचा आकार केवढा असावा व उष्णता निसटून जाऊ नये म्हणून किती अवरोध लेप (इन्सुलेशन कोटिंग) द्यावा, यासाठी गणित मांडावे लागते.

अभियांत्रिकीतील आधारभूत विज्ञान हे वरवर पाहता साधेसुधे वाटते. उदाहरणार्थ, दोन ठोकळे घ्या. त्यामध्ये थोडे अंतर ठेवा. त्या ठोकळ्यांवर बसू शकेल इतकी एक लांब पट्टी घ्या व ती ठोकळ्यांवर ठेवा. ही पट्टी म्हणजे एक पूल झाला. या पुलांवरून मुंग्या जाऊ शकतील! ही पट्टी पदार्थविज्ञानातील तरफ (लिव्हर) या वस्तूंच्या प्रमेयानुसार काम करते. या पट्टीवर जास्त भार टाकला तर ती वाकते, ठोकळ्यांवर पूर्णपणे टेकून राहत नाही, काही प्रमाणात ती ठोकळ्यांपासून वर उचलली जाते. पण समजा, त्या पट्टीच्या दोन्ही टोकांवर आपण मुळात जाड पुस्तके ठेवली तर ही पट्टी भार घेताना तितकीशी वाकणार नाही व अधिक समर्थपणे पुलाचे काम करील. यामागील विज्ञानाची प्रमेये दिसायला सोपी वाटतात. तसेच, फळ्यावर किंवा कागदावर याची आकृती काढणे सोपे आहे.

असे असले तरी प्रत्यक्ष व्यवहारात हे सुगम विज्ञान वापरताना अभियंत्यापुढे कित्येक आव्हाने येतात. अभियांत्रिकीची एक आर्थिक बाजू असते. जी रचना करायची ती पुरेशी मजबूत व सुंदर तर हवीच; पण ती कमीतकमी खर्चात व्हायला हवी. ही आर्थिक बाजू आपण येथे विचारात न घेता पुढे जाऊया. समजा, एक ओढा आहे व त्यावरून आरपार जाण्यासाठी एक छोटा पूल हवा आहे. ओढा लहान असेल तर एखादा लाकडी ओंडका किंवा लाकडाची जाड फळी पूल म्हणून वापरता येईल.

आता हा ओंडका ओढ्याच्या काठावरून दुसऱ्या काठापर्यंत कसा ठेवायचा, तात्पुरता एखादा कामगार त्या ओढ्यात ओंडका पकडायला उभा राहील काय, ओंडका ज्यावर टेकेल त्या काठाची माती भुसभुशीत आहे की तेथे टणक दगड आहेत, मुळात हा ओंडका किती व्यासाचा असावा, असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. याबाबत गणित न मांडता अनुभवाच्या बळावर काही निर्णय घेता येतील. यात देखील अभियांत्रिकी आहे; परंतु एखाद्या मोठ्या नदीवर पूल बांधायचा झाल्यास विविध प्रकारची गणिते, विविध प्रकारची यंत्रसामुग्री यांचा उपयोग होतो. उदाहरणार्थ, नदीमध्ये एखादा खांब बांधायचा झाल्यास तेथील प्रवाह तात्पुरता अडवावा लागतो. समजा, पूल पोलादाचा असेल तर त्यातील घटकांची योग्य निवड करावी लागते. त्यांचे वेल्डिंग करावे लागते. असे कित्येक प्रश्न व उपाय यांना सामोरे जावे लागते. एखादी गोष्ट लहान प्रमाणात असते तेव्हा छंद, कलाकृती,

चिकाटी या योगे तिची पूर्तता करता येते; पण ती गोष्ट प्रचंड प्रमाणात असते तेव्हा विज्ञानाची विविध प्रमेये व गणित यांचा आश्रय घ्यावा लागतो.

जी कथा पुलाची तीच पंपाची – म्हणजे असे की, एखाद्या नळीत पिस्टन सरकवला तर हवा एका बाजूस कोंडली जाऊन तिचा दाब वाढतो, हे साधेसुधे विज्ञानप्रमेय आहे. काही गावठी पंप या प्रकारचे असतातच; परंतु मोठ्या प्रमाणावर पंप निर्माण करायचा झाल्यास; उदाहरणार्थ, मोटारगाडीतील सिलिंडरमध्ये पिस्टनची हालचाल उत्तमपणे व्हावी व विवक्षित वेळी वायुमिश्रणाला दाब द्यावा अशी योजना करायची असेल, तर मोठे अभियांत्रिकी कौशल्य लागते. सिलिंडर पिस्टनबरोबर वर्तुळाकार छेदाकृतीचे बनवावे लागतात. पिस्टन झिजला तर तो बदलायचा कसा याची योजना करावी लागते. पिस्टनच्या घर्षणाने उष्णता निर्माण होते व त्यामुळे सिलिंडर व पिस्टनचा व्यास बिघडू शकतो. म्हणून ही उष्णता बाहेर फेकण्यासाठी सिलिंडरमध्ये खेळत्या पाण्याचे आवरण ठेवावे लागते. अशाप्रकारे अनेक प्रश्न व उपाय अभियंत्यास विचारात घ्यावे लागतात. प्रत्येक बाबतीत विज्ञानाची प्रमेये वापरावी लागतात. उदाहरणार्थ, घर्षणामुळे कितील उष्णता निर्माण होईल? ही उष्णता सहन करण्यासाठी कोणते धातू वापरावेत? मोटारगाडीचा प्रवास चालू असताना सिलिंडरवर कोणते भार येतील? विज्ञानाचा असा चौफेर विचार अभियंत्याला करावा लागतो. कधीकधी कूट गणिते न मांडता एखादी व्यवहार्य योजना करून अभियंता कार्य साधतो.

सारांश अभियांत्रिकी म्हणजे व्यवहारात आणलेले चौफेर व विस्तृत प्रमाणावरचे विज्ञान.

साध्या पतंगाला एक सरळ काडी असते व एक वाकलेली काडी असते. असे का करतात? हा प्रश्न वर्ष ६ अंक ४ मध्ये पान ४३ वर आपण वाचलाच असेल. त्याचे उत्तर म्हणजे साधा कागद फडफडेल. त्याला ताण घेण्याचे सामर्थ्य नसते; परंतु या काड्यांमुळे हे सामर्थ्य येते. पुलांच्या कमानीमध्ये अशाच प्रकारचे प्रमेय असते.

●●

**म. ना. गोगटे**
४ पवन अपार्टमेंट, नवी पेठ,
पुणे ३०

# तिळगूळ घ्या गोड गोड बोला!


जानेवारी महिना म्हटलं की, थंडीबरोबर संक्रांतीची चाहूलही आपल्याला लागते. तीळ उष्ण असल्यामुळे तिळाच्या वड्या, लाडू, हलवा असे तिळाचे विविध पदार्थ आपण संक्रांतीला करतो. पांढराशुभ्र किंवा रंगीत हलवा तुम्हा मुलांना तर नेहमीच मोहात पाडतो. तुमची आजी पूर्वी करायची तसा हलवा तुम्ही यंदा घरी केला तर? आईची शाबासकी नक्कीच मिळेल नाही? पाहूया तर, हलव्याची कृती:

**साहित्य :** मुठभर पांढरे शुभ्र तीळ, १ किलो साखर, दूध २ चमचे, आंबट ताक १ चमचा, अर्धे लिंबू आणि साखर बुडेल एवढे पाणी.

**कृती:** साखर बुडेल एवढे पाणी घेऊन त्यात २ चमचे दूध घाला व सर्व मिश्रण एक तासभर भिजत ठेवा. नंतर स्वच्छ पातेल्यात हे मिश्रण घालून ते मंद गॅसवर उकळायला ठेवा. पाक, हाताला चिकट लागला की खाली उतरावा. पाक कोमट झाला की, पांढऱ्या स्वच्छ फडक्याने गाळून घ्या. या गाळलेल्या पाकात २ चमचे आंबट ताक घाला व तो परत उकळा. पुन्हा त्याला खाली उतरवून घ्या व तो कोमट झाल्यावर त्यात लिंबाचे ४ ते ५ थेंब टाका. लिंबाच्या थेंबामुळे हलका चकचकीत दिसतो. हा पाक पुन्हा स्वच्छ फडक्याने गाळून काचेच्या बरणीत अथवा स्वच्छ पातेल्यात ठेवा.

आता प्रत्यक्ष हलवा कसा करतात? ते बघुया! एका पसरट भांड्यात (शक्यतो पितळी) धुऊन वाळवलेले तीळ टाकून मंद गॅसवर ठेवा. सुरुवातीला तीळांवर पाकाचा १-१ थेंब टाकून हाताने हलवत राहावे. गॅसपाशी जपून बसावे व हाताने काळजीपूर्वक हलवावे. चटका बसण्याची शक्यता असते किंवा यासाठी आईची मदत घ्यावी. पाक मधे मधे कोमट करावा. तिळाला काटा यायला लागल्यावर पाकाच्या थेंबाचे प्रमाण वाढवावे. हलवा अलगत हाताने हलवावा. आपल्याला पाहिजे तेवढ्या आकाराचा हलवा होईपर्यंत असे करावे. रंगीत हलवा करण्यासाठी चिमूटभर खायचा केशरी रंग अर्धी वाटी पाकात चांगला मिसळून तो पाक तिळावर थेंब थेंब टाकावा.

अशाप्रकारे खसखस, पोहे, चुरमुरे, चौकोनी खडीसाखर, बदाम, काजू, लवंगा, वेलदोडे, डाळं, लाल भोपळ्याच्या बिया, यावरही हलवा करता येतो. याचा उपयोग हलव्याचे दागिने करण्यासाठी होतो. पुठ्ठ्याचा मुकुटासारखा आकार कापून त्याला सोनेरी कागद लावा व फेवीकॉलच्या साह्याने त्यावर हलवा चिकटवा. अशाच प्रकारे कंबरपट्टा, घड्याळ, अंगठी करता येते. तसेच, चांगला दोरा घेऊन तो गाठ मारून पायात धरावा. त्यात हलवा ठेवावा, गाठ मारावी, परत दुसरा हलवा ठेवावा, गाठ मारावी. मधे कागदी फुलं, मणी असे सजावटीसाठी घालावे. अशी माळ करून त्याचा हार, मंगळसूत्र, बांगड्या, नेकलेस असे दागिने करता येतील. मग एकदा प्रयत्न करून बघणार ना?



# पियुषचा वाढदिवस

**विवेक घळसासी**

**दरवर्षी, आपण एका दिवसाची अगदी आतुरतेने वाट बघत असतो. आपला वाढदिवस! मित्रमैत्रिणी आपल्याला शुभेच्छा देतात, वेगवेगळी खेळणी, भेटकार्डे देतात. नवे कपडे मिळतात. आपण ऐटित केक कापतो. सगळे लाड करतात. खाणे-पिणे, खेळणे नुसती धम्माल ना!**
**पण या सगळ्यात आधुनिकता आणण्याच्या प्रयत्नात आपण आपल्या संस्कृतीला तर विसरत नाही ना? ''आपले पुढील आयुष्य चांगले प्रकाशमान व्हावे, यासाठी ज्योती तेववायच्या की दिवे फुंकून विझवायचे?'' आजीच्या प्रश्नाने पियुषसकट सगळ्यांनाच कोड्यात टाकले. नक्की काय म्हणायचे होते आजीला?...**

पियुषच्या वाढदिवसाला म्हणून आजी आली. आजी यावी अशी सगळ्यांचीच खूप इच्छा होती. काही ना काही कारणाने; पियुषला कळायला लागले तसे आजीचे येणे झालेच नव्हते. यंदा मात्र पियुषने हट्ट धरला आणि त्याच्यासाठी आजी आलीही.

पियुषने स्वत:च्या आवडीचे तयार कपडे आणले. सगळ्यांनी कपड्यांची खूप प्रशंसा केली. आजी त्याला काही म्हणाली नाही; पण लेकीला म्हणाली, ''तुम्ही सगळे त्या कपड्यांचे कौतुक करता; पण वाढदिवसाला मुद्दाम काळा सदरा कशाला आणला, एवढेही त्याला कोणी का विचारत नाही?'' लेकीकडे आईच्या प्रश्नाचे उत्तर नव्हते. ''रंगात काही शुभाशुभ नसते ग आई, शेवटी हे सगळे त्याच्या आनंदासाठीच चालले आहे ना?'' पियुषची आई म्हणाली आणि वाटण करू लागली.

पियुषच्या बहिणींनी दिवाणखाना सजवून काढला. पताका, झिरमिळ्या, फुगे आणि कसलीकसली चित्रे लावून सजावट केली होती. आजीला ओढतच धाकटीने आणले आणि म्हणाली, ''घर किती छान सजले आहे ना?'' आजीने डोळा भरून सजावट पाहिली. म्हणाली, ''खूप छान आहे; पण मध्येच हा मेज कशाला?'' धाकटीने आजीला मेजजवळ नेले आणि सांगू लागली, ''आजी, इथे मोठ्ठा केक ठेवायचा आहे. पियुष तो कापणार. मग मेणबत्त्या फुंकून विझवायच्या. आपण सगळ्यांनी टाळ्या वाजवायच्या. त्याच वेळी ताई टेपरेकॉर्डर ऑन करेल. मग सगळ्यांनी धमाल करून अॅटॅक करायचा. अॅटॅऽऽऽ क!!''

आणि ठरल्याप्रमाणे झालेही तसेच! पियुषच्या मित्र-मैत्रिणींनी सगळे घर डोक्यावर घेतले. केक कापणे, मेणबत्त्या फुंकणे, टाळ्या, नाच आणि अॅटॅऽऽक!! सगळी खाण्याच्या मेजाकडे धावली तेव्हा कुठे आजीला 'अॅटॅऽऽक' म्हणजे काय ते कळाले. लेकीच्या मैत्रिणी, जावयाचे मित्र काहीबाही खात-पीत बसले. मुलांचा गोंधळ आणि मोठ्यांचे हसणे वाढतच गेले. दोन-तीन तासांनी सगळा गोंधळ ओसरला. सगळे घर शांत झाले.

''मजा आली ना आई? सगळे कसे मजा करीत होते. गिफ्ट तरी किती जमल्या ना?'' लेकीचे बोलणे आजीने ऐकले. आजीने म्हटले, ''अगं, पण पियुषचे औक्षण तरी करा!'' लेक फक्त खळखळून हसली. पियुषला औक्षण आवडत नाही, हे कसे सांगावे असा प्रश्न लेकीला पडला. ''आई, पियुष म्हणतो की तो काय देव आहे, त्याला ओवाळायला? आपण तरी कशाला उगाच त्याच्या मागे लागायचे? शेवटी हे सगळे त्याच्या आनंदासाठीच चालले आहे ना?'' आजी गप्प बसली. तिला काहीतरी सांगायचे होते, तरीही ती गप्प बसली.

रात्री कितीतरी वेळ आजी झोपलीच नाही.

सकाळी उठली. आज सुटीचाच दिवस होता. नातवंडे रेंगाळली होती. आजीच्या भोवती उगाच बसली होती. धाकटी म्हणाली, ''आजी, मजा आली की नाही काल?''

आजीला हीच संधी हवी होती. पियुषला जवळ घेत ती म्हणाली, ''हो खूप मजा आली. मलाही नाचावे वाटत होते आणि तुमच्यासारखेच ते काय 'ॲटॅक' की काय करावे वाटत होते.''

''आजी, ॲटॅक म्हणजे आक्रमण! शत्रूवर जसे तुटून पडतात तसे पदार्थांवर तुटून पडायचे.'' पियुष म्हणाला. आजी हसली. ताईचा हात धरून म्हणाली, ''पदार्थांना शत्रू मानून खाल्ल्यावर रक्तात द्वेषच वाढणार ना बाळांनो! अन्नाला शत्रू नव्हे तर पूर्णब्रह्म मानायचे असते.''

''अगं, मजा ग आजी, खरेच का अन्न शत्रू होते?'' धाकटी म्हणाली. तिच्या कपाळावरचे केस मागे सारीत आजी म्हणाली, ''सगळे असे मजेवर नेऊन कसे चालेल? खाण्याची चढाओढ लावा हवी तर. तुमचे आजोबा चाळीस चाळीस गुलाबजाम खात. तुम्ही खाल्ले किती आणि नासले किती आठवा बरे!''

मुले प्रथमच काही वेगळे ऐकत होती. ताईला तर आजीच्या बोलण्याने गंभीरच केले. ''आजी, खरेच खूप वाया गेले नाही?'' तिच्या थोरलेपणाला आकार आला. आजीला तर हेच हवे होते. लेक गंभीर होईल अशी अपेक्षा होती; पण ती आपल्याच नादात! नातवंडे ऐकतात म्हटल्यावर आजी म्हणाली, ''बाळांनो, वाढदिवस शुभ की अशुभ?'' सगळी 'शुभ' म्हणाल्यावर आजीने विचारले, ''अशा शुभ वेळी दिवे फुंकून विझवायचे की ज्योती तेववायच्या? ज्याचा वाढदिवस त्याला ओवाळायला नको?''

''आजी मी काय देव आहे का ओवाळायला?'' पियुष म्हणाला. लोळणाऱ्या पियुषला उठवून बसवत आजी म्हणाली, ''देव नाहीस, पण देवासारखा व्हावास म्हणून ओवाळायचे बाळा! आणि फक्त देवालाच ओवाळतात असे कोणी सांगितले? चल, आंघोळ कर. आज मी तुला ओवाळते, बघ, त्यातही तुला खूप आनंद वाटेल की नाही! नाही आवडले तर पुन्हा ओवाळून घेऊ नकोस.''

सगळी पाखरे आंघोळीला गेली. आजीने तोवर औक्षणाचे तबक तयार केले. दोन निरांजने तबकात ठेवली. घरात फुलवात सापडली नाही. लेकीकडून बँडेजचा कापूस घेतला. त्याच्या वाती केल्या. तबकात कुंकू लावून अक्षता ठेवल्या. दुर्वांकूर आणून तेही तबकात ठेवले. सुपारी, कापूस, अंगठी ठेवली. जमिनीवर मोठी रांगोळी काढली. पाट नव्हता. मग एक चादरच घडी घालून ठेवली.

सगळी जमल्यावर पियुषला समोर बसवले. निरांजने लावली. पियुषच्या मस्तकावर कुंकवाचा टिळा लावला. 'इथे शिव नांदतो. इथेच भाग्यलेख लिहिलेला असतो. त्याची जाणीव व्हावी म्हणून हा टिळा. तुझ्या कपाळी जसा हा टिळा शोभतो तसा तू या घराण्याच्या मस्तकावरचा तिलक हो. घरीदारी तू शोभून दिस. म्हणून मी हा टिळा लावते.'

पियुषच्या मस्तकावर अक्षता टाकून आजी म्हणाली, ''तुझे जगणे अ-क्षत व्हावे, अ-क्षय व्हावे, कशानेही तुला क्षती पोहचू नये. तू समृद्ध आणि संपन्न जीवन जगावेस. तुझ्या सुखाचा, आरोग्याचा क्षय-नाश होऊ नये यासाठी या अक्षता म्हणजे शुभेच्छा आहेत. सद्भावना आहेत.''

मग सुपारी घेऊन आजीने पियुषच्या कपाळाला लावली. सुपारी उजवीकडून डावीकडे आणि डावीकडून उजवीकडे फिरवली. ''सुपारीच्या वृक्षासारखा उंच हो, मोठा हो. साऱ्या बाजूने सुपारीसारखा टणक हो. सुपारी हे पुजेत गणेशाचे प्रतीक आहे. तुझ्याभोवती सदैव गणेशाच्या कृपेचे मंडल राहो. तू प्रत्येक कामात यशस्वी हो.''

सोन्याची अंगठी पियुषच्या कपाळाला लावत आजी म्हणाली, ''बाळा, सोन्यासारखा मौल्यवान हो, सोन्यासारखा शुद्ध हो, समाजाचा अलंकार हो. सगळ्यांनी सोन्यासारखे तुला जपावे. सांभाळावे.'' सुपारीप्रमाणे अंगठीही उजवीकडून डावीकडे आणि डावीकडून उजवीकडे फिरवून आजीने पियुषच्या डोक्यावर दुर्वा ठेवल्या.

दोघी नाती आणि लेक औक्षणाचा सोहळा पाहात होत्या. सगळ्यांना मजा वाटतच होती. आजी म्हणाली, ''दुर्वा ही अशी वनस्पती आहे, की जी दाह शमन करते. मोह-मद-मत्सर वगैरेंनी शरीरात दाह होतो, तुझ्या शरीरातील दाह आणि दाह निर्माण करणारे दोष कायमचे नष्ट होवोत. कमीत कमी पाणी असूनही ही वनस्पती वाढते, विस्तारते. अभावांचा बाऊ न करता तू मूळ धर. विस्तारत जा. विकसित होत. प्रेमाने धरा व्यापत जा.''

पियुषच्या डोक्यावर कापूस ठेवून आजी म्हणाली, ''म्हातारा हो. म्हणजेच खूप जग. कापसासारखे शुभ्रतेचे खूप जग. जोवर सरकी आहे, गाठी आहेत, कचरा आहे तोवर त्या

कापसाचा काही उपयोग नाही. बाळा, तपश्चर्येच्या-साधनेच्या धनुकलीवर स्वत:ला पिंजून घे. वाईट सगळे काही त्या पिंजण्यानेच दूर जाईल. मगच तू धागा बनण्यास पात्र होशील. असा धागा बांधण्यासाठी, सांधण्यासाठी उपयोगी येईल. तू असा हो. सारे सांधणारा!''

''पियुष, आता या दोन ज्योती. ही विद्या, हे धन. ही साधन, ही समर्पण. एक ज्योती जिवाची, एक आहे शिवाची. या दीपकळ्यांनी मी तुला ओवाळते. तुझे सार जगणे आता उजळलेल्या तुझ्या चेहऱ्याप्रमाणे उजळून निघो. लपवावे, झाकावे असे काळोखाचे कणही तुझ्या जगण्यात नसावेत. असा तेवत राहा. प्रकाशित होत राहा. म्हणून मी तुला ओवाळते.'' आजी म्हणाली.

चिमूटभर साखर पियुषच्या तोंडात टाकून आजी म्हणाली, ''इतके सारे मिळाल्यावरही जीभ गोड ठेव हे सांगण्यासाठी ही साखरेची चिमूट! ज्याची जीभ गोड त्याला कोणती तोड? जिभेबद्दल असे म्हणतात की, जिच्यावर गोडी ती जगाला जोडी! सगळे मिळवूनही अहंकाराचे कडू शब्द जिभेवर येऊ देऊ नको. नम्रतेची मधुरता कायम ठेव.''

पियुषच्या तोंडात साखर घातली आणि खूप प्रेमाने आजीने त्याला छातीशी धरले. त्याच्या पाठीवरून हात फिरवीत आजी म्हणाली, ''वाढदिवस हा मजेचा क्षण खरा; पण आपण 'वाढलो' याचाही विचार केला पाहिजे. वयाचे काय, ते वाढतच जाते. समज मात्र वाढवावी लागते. आपण वर्षाने मोठो झालो. हे मोठेपण नुसत्या वयापुरते राहू द्यायचे नसेल तर याक्षणी काही संकल्पही करावे. जेवढ्या वर्षांचा झालो तेवढ्या संख्येत मी यंदा अभ्यासाव्यतिरिक्त पुस्तके वाचेन. मी रोज एक तास इतरांसाठी काही काम करेन. रविवारी आईला विश्रांती देऊन मी सकाळची न्याहरी करेन. मी घर साफ ठेवेन. मी दरमहा एक देशभक्तिपर गीत पाठ करेन. यावर्षी मी गीता पाठ करेन. पियुष, तूही संकल्प कर. फक्त देवाला तो सांग. पूर्ण झाल्यावर सगळ्यांना सांग.



वयाने तर मोठा होच, पण मनानेही मोठा हो!'' आजीने पियुषला भरभरून आशीर्वाद दिले.

आजीपाठोपाठ तिघींनीही पियुषचे औक्षण केले. वातावरण खूप प्रसन्न होते. ताई म्हणाली, ''आजी, हाच खरा वाढदिवस झाला असे वाटते.

आजीने मग सगळ्यांचेच आळीपाळीने औक्षण केले. तेवढ्यात पियुषचे बाबाही आले. आजीने त्यांनाही ओवाळले. खूप दिवसांनी त्यांना कोणी ओवाळले होते. त्यांचे डोळे भरून आले. त्यांनी सासूबाईंना नमस्कार केला. सासूने पाठीवरून प्रेमाने हात फिरवला. तसा त्यांना हुंदका आवरता आला नाही. साऱ्यांचीच मने भरून आली होती. न बोलता येणारा आनंद घरात भरला होता. आजी लेकीजवळ गेल्या- तिच्या खांद्यावर हात ठेवत म्हणाल्या, ''शेवटी त्यांच्या आनंदासाठीच करायचं असतं सगळं हे खरं ग राणीबाई, पण त्यांचा आनंद खरा कशात आहे, हे त्यांना सांगण्याची जबाबदारी आई म्हणणारीचीच असते. मजा तर हवीच, पण संस्कारांना- सुविचारांना सोडून होते ती मजा विनाशकारी असते. खाणे तेच असते ग, 'अॅटॅक' म्हणून खायचे की प्रसाद म्हणून खायचे यावरच आपले माणूसपण ठरत असते.''

आजीच्या बोलण्याने पियुषचे आई-बाबा चकित झाल्यासारखे दिसत होते आणि मुले खुलल्यासारखी जाणवत होती.

●●

**विवेक घळसासी**
१५, वामननगर, जुळे सोलापूर

# अभ्यासातील स्वावलंबन

# लेखन कौशल्य– भाग १

– प्रा. विवेक पोंक्षे

अभ्यास–पायऱ्यांमध्ये वाचनाइतकेच महत्त्व लेखनाला आहे. वर्गात शिकवलेला आशय समजल्यानंतर, आवश्यक तेव्हा तो स्वभाषेत व्यक्त करायला लागतो. आपल्याला काय समजले ते दुसऱ्यापर्यंत पोहोचविण्यासाठी, अभिव्यक्तीचे कौशल्य आपल्याजवळ हवे. ही अभिव्यक्ती, आपल्या शिक्षण प्रक्रियेत, प्रामुख्याने लेखनातून होत असते. लेखनाबरोबरच मौखिक पद्धतीने मुलाखतीतून अथवा प्रात्यक्षिकांद्वारा कृतीतूनही, आपल्याला काय समजले, हे दुसऱ्यापर्यंत पोहोचवता येते. परंतु लेखी परीक्षांना आजच्या काळात अधिक महत्त्व असल्याने, लेखन कौशल्यावर प्रभुत्व मिळवणे आवश्यक ठरते.



आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे लेखन करत असताना आपण मिळवलेल्या ज्ञानाची नवी मांडणी करण्याची संधी आपल्याला मिळत असते. त्या निमित्ताने हे ज्ञान पक्के व्हायला मदत होते. जुन्या विचारानुसार शिक्षण म्हणजे ३R's (Reading, Writing, Arithmatic) आजही या तिन्ही कौशल्यांना अध्ययनात तितके महत्त्व आहेच.

लेखन कौशल्याचा विचार करताना, दोन प्रकारच्या लेखनाचा विचार करता येईल. एका प्रकारातील लेखन म्हणजे विविध भाषांवर प्रभुत्व मिळवण्यासाठी अथवा मिळवत असताना करायचे लेखन. भाषा विषय शिकत असताना आपण अशा प्रकारचे लेखन करतो. त्यात मुख्यत: आपले विचार, कल्पना, अनुभव, प्रभावी भाषेत, आकर्षकरित्या व्यक्त करायचे असतात. दुसऱ्या प्रकारातले लेखन म्हणजे, भाषेच्या माध्यमातून आपण जे विज्ञान, गणित, सामाजिक शास्त्रे इ. विषयातील ज्ञान मिळवतो, ते अचूक व नेमक्या शब्दात व्यक्त करणे. दोन्ही प्रकारच्या लेखनाची उद्दिष्टेच भिन्न असल्याने, त्या प्रकारचे लेखन करण्यासाठी आवश्यक असणारी कौशल्ये व तंत्रेही भिन्न असतात. परंतु दोन्ही प्रकारचे लेखन करण्यासाठी पूर्वतयारी आवश्यक असते. दोन्ही प्रकारात तुम्ही किती लिहिता? यापेक्षा तुम्ही कसे लिहिता? हे महत्त्वाचे ठरते.

**लेखनाची पूर्वतयारी –**

**१) विषयावर प्रभुत्व –** वर्गात जे शिकलो, त्याचा घरी स्वाध्याय करताना, आपण लेखन करणे अपेक्षित असते. बऱ्याचदा हे लेखन आपण 'गृहपाठ' या नावाने करतो. हे लेखन यथार्थ व्हायचे

असेल तर, शिकलेला आशय उत्तम समजलेला असायला हवा. पूर्ववाचन करताना, मनात निर्माण झालेल्या शंका, प्रश्न यांचे संपूर्ण निरसन, शिकताना झालेले असायला हवे. आशयातील बारीक-सारीक तपशीलसुद्धा मनात टिपलेले हवेत.

**२) अनुभवांचे भांडार –** भाषा विषयातील लेखनासाठी वैविध्यपूर्ण अनुभव आपल्यापाशी हवेत. मग ते स्वत: घेतलेले अथवा दुसऱ्यांनी घेतलेले व शब्दबद्ध केलेले अनुभव असतील. ते अनुभव कोठे व कसे मांडायचे, हे तंत्र आहे. परंतु मुळात आपले अनुभवविश्वच तोकडे असेल तर लेखन त्रोटक होते. त्यामुळे वेगवेगळे अनुभव डायरीत टिपून ठेवले पाहिजेत. संधी मिळेल तेव्हा नवनवे अनुभव घेतले पाहिजेत. असे अनुभव घेण्याची संधी सहली, प्रवास, स्पर्धा, शाळेतील विविध कार्यक्रम, समाजात व घरी होत असणारे सण-उत्सव इत्यादीतून मिळत असते.

**३) समृद्ध वाचन –** बऱ्याचदा अनेक विद्यार्थी फक्त अभ्यासाची पाठ्यपुस्तकेच वाचतात, परंतु पाठ्यपुस्तकांच्या बरोबरच, खूप अवांतर वाचन करण्याची आवश्यकता आहे. या अवांतर वाचनातून इतरांचे अनुभवविश्व आपल्यासमोर उघडले जात असते. अवांतर वाचनातून आपल्या लेखनशैलीवर नकळत परिणाम होत असतो.

**४) सुसंगत विचार करण्याची सवय –** आपले लेखन विस्कळित व्हायचे नसेल, तर आपली विचाराची बैठक पक्की हवी. एका मुद्द्यातून दुसरा मुद्दा निघून, लेखनाचे मध्यवर्ती सूत्र त्यातून उलगडत जावे. लेखनातला गोंधळ हा विचारातल्या गोंधळाचा निर्देशक असतो. म्हणून चांगले लेखन करण्यासाठी विश्लेषणात्मक विचार करता यावा लागतो. विशेषत: वैचारिक निबंध, दीर्घोत्तरी प्रश्नांची उत्तरे, रसग्रहणात्मक लेखन यासाठी अशा विचाराची फार आवश्यकता असते.

**५) सूक्ष्म निरीक्षण –** पु.ल. देशपांड्यांची पुस्तके, तुम्हा-आम्हाला खूप आवडतात. केवळ त्यांचे लेखन विनोदी आहे म्हणून ती आवडतात असे नाही, तर पु.लं.चे मनुष्य स्वभावांचे निरीक्षण फार सूक्ष्म आणि अचूक असते. वागण्या बोलण्यातील विसंगती त्यांच्या चटकन लक्षात येते. ही विसंगती नेमकी टिपून ते त्यातून विनोद निर्माण करतात. व्यंकटेश माडगूळकरांची पुस्तके तुम्ही वाचली तर तुमच्या लक्षात येईल की सभोवतालच्या निसर्गाचे, माणसाच्या जगण्याचे ते अतिशय तपशिलवार वर्णन करतात. हे तपशील त्यांच्या निरीक्षणाचा परिणाम आहे. हे निरीक्षण ते अगदी बालवयापासून करत आले आहेत व पुढे ते त्यांच्या साहित्यात प्रतिबिंबित झाले आहे.

**६) उत्तम शब्दसंग्रह –** चांगले विचार, हृदयस्पर्शी अनुभव व्यक्त करण्यासाठी, भाषाही संपन्न हवी. त्यासाठी तुमचा शब्दसंग्रह मोठा आणि वैविध्यपूर्ण हवा. अचूक व नेमक्या शब्दयोजनेने लेखन आकर्षक होते. त्यासाठी काही खास शब्द तुमच्याजवळ हवेत. एकच अनुभव किती वेगवेगळ्या शब्दात व्यक्त करता येतो ते पाहू.

**१)पहाट झाली. सूर्य उगवला.**

**२) बाहेर झुंजमुंज झाले होते. अरुणरथावर आरूढ होऊन आदित्यराजा पूर्वेकडून दरबारात प्रवेश करत होता.**

**३) तांबड फुटलं आणि थोड्याच वेळात सूर्यदेवाचं आभाळात आगमन झालं.**

यासाठी मुद्दाम स्वत:चा असा शब्दसंग्रह तयार असायला हवा.

उदा: विविध प्रकारची विशेषणे गोळा करावीत. त्यांचा उपयोग लेखनात खूप होतो. अक्राळ-विक्राळ राक्षस, पिसाटलेला समुद्र, निरभ्र आकाश, आसुसलेली धरती, हरिश्चंद्रासारखा दाता, घोंघावणारा वारा,

फेसाळणारा प्रपाप इ. शब्दसंग्रह करताना, वेगवेगळ्या गटात करावा. रोज नवीन पाच तरी शब्द माहीत करून घेईन व ते वापरण्याचा प्रयत्न करीन, असा प्रयत्न करावा. वर्तमानपत्रात येणारी शब्दकोडी सोडवण्याचा जरूर प्रयत्न करावा. लेखनाच्या पूर्वतयारीचा अभ्यास म्हणून त्याचा चांगला उपयोग होईल.

**लेखनाचे सर्वसामान्य नियम –**

लेखन प्रकारानुसार लेखनाचे तंत्र जरी बदलत असले तरी लेखनासाठी काही नियम असतात व त्याच्या वापराने आपले लेखन तर सुधारतेच, पण वाचनीयही होते.

**१) व्याकरणिक शुद्धता –** लेखन हे व्याकरणाच्या दृष्टीने शुद्धच असले पाहिजे. व्याकरणाच्या नियमांचे व शुद्धलेखनाच्या नियमांचे सर्वच लेखनात पालन करणे गरजेचे असते. त्याचा चांगला परिणाम वाचकावर होत असतो. लेखनात ऱ्हस्व-दीर्घाच्या, स्पेलिंगच्या चुका राहू नयेत यासाठी नेहमीच्या वापरातील शब्द, संज्ञा पाठ्यपुस्तकात बघून लिहा. अपवाद असणारे शब्द छोट्या वहीत नोंदवून ठेवा व ते लिहिण्याचा सराव करा. शुद्धलेखनाने वाचकाच्या मनावर, पहिला चांगला ठसा उमटतो.

**२) सुयोग्य वाक्यरचना –** लेखन प्रभावी होण्यासाठी अर्थवाही वाक्यरचना करावी लागते. यासाठी अचूक शब्दांची निवड करावी. शास्त्रीय संज्ञा, ऐतिहासिक शब्द असे वैशिष्ट्यपूर्ण शब्द पुस्तकातून तसेच वापरावेत. भाषा पुस्तकी राहणार नाही याची काळजी घ्यावी. संयुक्त वाक्ये टाळून छोटी छोटी वाक्ये करावीत.

**३) विराम चिन्हांचा वापर –** विरामचिन्हांमुळे लेखन अधिक अर्थपूर्ण होते. त्यात अधिक स्पष्टता येते. योग्य जागी विरामचिन्हे घातल्याने वाक्य तोडून वाचणे सोईचे होते व योग्य तोच अर्थ वाचकांपर्यंत पोहोचतो. यासाठी विरामचिन्हांचे अर्थ समजावून घ्या व लेखनात त्यांचा जाणीवपूर्वक वापर करा.

**४) लेखनात परिच्छेदांची रचना –** लेखन करताना, आपण विचारांची शृंखला शब्दबद्ध करीत असतो. एक मुद्दा व त्याचा विस्तार, यासाठी एक परिच्छेद, अशी रचना लेखनात केली तर लेखन सुटसुटीत होते व त्यामुळे त्यातील अर्थही सहज उलगडत जातो. पाच-सहा ओळींचा एक परिच्छेद, असे छोटे छोटे परिच्छेद असावेत. मोठ्या परिच्छेदातील महत्त्वाचे मुद्दे अधोरेखित करा. परिच्छेदामुळे लेखनात नेमकेपणा येतो. स्पष्टता येते. दोन किंवा अधिक विचार परस्परांत मिसळत नाहीत.

**५) आकर्षक सुरवात व समर्पक शेवट –** कोणत्याही लेखनाच्या सुरुवातीच्या परिच्छेदावरून, पुढचा मजकूर वाचायचा की नाही, ते वाचक ठरवत असतात. त्यामुळे पुढील मजकूरात काय असणार आहे? याची चाहूल पहिल्या परिच्छेदातून लागली पाहिजे. साधारणपणे, दीर्घोत्तरी प्रश्नांची उत्तरे लिहिताना अशी सुरुवात करतात. निबंधलेखनात अथवा कथालेखनात वेगवेगळ्या प्रकारे आकर्षक सुरुवात करता येते.

आपण लिहिलेल्या मजकुरात शेवटच्या परिच्छेदात मांडलेल्या मुद्द्यांचा सारांश देऊन शेवट करता येतो किंवा एखादे मत ठासून मांडायचे असेल तर त्याचा पुनरुच्चार करता येतो. लेखनातील मजकुराचा परिणाम दीर्घकाळ वाचकाच्या मनावर राहिला पाहिजे असा शेवट असावा.

निबंध लेखनात वेगळ्या प्रकारे शेवट करता येतो. कधी कलाटणी देऊन तर कधी समर्पक काव्य पक्तींत समारोप प्रभावी होऊ शकतो.

(लेखाचा उत्तरार्ध पुढील अंकात)

●●

**प्रा. विवेक पोंक्षे**
रघुराज सोसायटी, पुणे-सिंहगड रोड, पुणे ३०

**(दृश्य :–** विंगेतून दोन बाजूने दोन मुले शाहीराच्या वेशात येतात.
**पार्श्व संगीत :–** डफ, तुणतुणे हळू आवाजात. स्टेजवर मागील बाजूस स्त्रीचा पुतळा अथवा मोठे चित्र.)
**पठ्ठे बापुराव :** बाळगोपाळांनो, पाहाताय ना हा पुतळा!
**रामराव :** बापुराव, कुणाचा आहे तो? अहिल्यादेवीचा म्हणावा तर हातात फुलाची परडी नाही, हाती पुस्तक नसल्यानं सावित्रीबाईंचाही वाटत नाही.
**बापुराव :** रामराव,
**रामराव :** बोला, बापुराव.
**बापुराव :** थोर असूनही अज्ञात अशा एका माऊलीचा आहे तो.
**रामराव :** म्हणजे नाही चिरा, नाही पणती,
**बापुराव :** बरोबर, तर मग ऐका...
**रामराव :** अन् पाहादेखील, एका माऊलीच्या मायेची कहाणी.
(डफ तुणतुणे, आवाज मोठा होत असताना दोघे दोन बाजूला विंगेत निघून जातात. अंधूक प्रकाशात उभ्या पार्टीशनने रंगमंचाचे दोन भाग दिसतात. डाव्या भागात पाटलाच्या वाड्यातील ओसरी, अंगण. उजव्या भागात अन्य सर्व घटना दर्शविणे. उजव्या भागात पार–गावकरी जमलेले आहेत.)
**महादू :** काय गणपा! काय करायचं? पावसानं जाम डोळं वटारलेत.
**गणपा :** काय करावं समजत नाही! डोस्कंच चालत नाही. म्हणूनश्यान जमलो आहोत.
**केरबा :** हा ऽ हा ऽऽ बराबर हाय.

# माऊलीच्या मायेची कथा!

– दत्ता श्री. टोळ

**बारीक :** योक महिना गेला की, दोन येळाला खायला बी मिळायचं नाय.
**केरबा :** दाजीबा, तुम्हीच सांगा. तुमी लई पावसाळं काढल्येत. दुस्काळबी पगितले असत्याल. काय ते सपष्ट सांगा. अनमान नग. कंचीबी हयगय करू नगा.
**दाजीबा (वृद्ध):** कुटन बी तरी, सालभर पुरल अेवढं समद्याच्या घरी दानापानी असायला पायजेल. नाहीतर...
**केरबा :** आं, पर एवढं कोन देणार? गावात तशी मालदार मान्सं दोन. एक आपल पाटील अन् दुसरा घिसुलाल. घिसुलाल शेठजी तर भारी चिक्कू, चमडी दील पर दानाबी नाय देणार.
**हरबा :** जाऊ अन् विचारू तर खरं.
**गणपा :** कशाला हात दावून अवलक्षन.
**हरबा :** दाजीबा, तुम्हीच सुचवा काही येगळं.
**दाजीबा :** मला तर योकच रस्ता दिसतुया. पाटलाच्या वाड्यावर जाऊ अन् आपलं गाऱ्हान घालू त्येंच्या कानावर. पाटील अन् आईसाहेब आपलं मायबाप. तसे नाय पाठवणार परत.
**हरबा :** मंग! चला की; उशीर कशाला? (दिवे अंधुक होतात. आता डाव्या भागात प्रकाश. उजवी बाजू अंधारात. पाटलाचा वाडा. गावकरी प्रवेश करतात.)
**दाजीबा :** रामराम पाटील.
**पाटील :** रामराम.. (दचकून बघत) कोन आबा? तुम्ही सोता. सांगावा धाडला असता तर आलो असतो की आमी. (पाटील दाजीबाला नमस्कार करतात)
**दाजीबा :** राहू दे. राहू दे पाटील. उदंड औक्ष लाभू दे तुमाला.
**पाटील :** बोला, काय काम काढलं?
**दाजीबा :** काम सगळ्या गावाचं हाय. मीबी गावातला म्हनून माजं बी, बोलू का?
**पाटील :** (होकारार्थी मान हलवत) हंऽऽ
**दाजीबा :** गावात दुस्काळ पडलाय.
**पाटील :** सालभरचा सारा माफ करतो.
**दाजीबा :** पर पोटाला काय? काटं भरायचं काय? आरं ऽऽ टाचा घासून मरायचं; नाय तर पोटात काटं भरायचं.
**पाटील :** तर मग घरट्टी एक एक चुंगड धान्य देतो. घ्या (गावकरी गप्प... कुणी पुढं जाऊन चुंगड घेत नाही)
आरं, असं गप्प का?
(पाटलीणबाई प्रवेश करतात)
**पाटलीण :** अवो. असं काय करता. एका वर्सासाठी एवढंच धान्य? जरा आठवा त्यो दामाजी, समदं कोठार लुटु दिलं त्यानं. म्हनून श्यान त्याला

इट्ठल भेटला.
**पाटील :** मग काय करू मी?
**पाटलीण :** तुमी बी तसं करा. लुटु दे आपलं कोठार.
**पाटील :**(जरा नाराजीनंच) बरं! जशी तुझी मर्जी...
**गावकरी :** आईसाहेबांच्या नावानं चांगभल!
**केरबा :** आईसाहेब एक विनंती. पोतं तुमच्या हातानं द्या. तुमचा हात पुण्याचा हाय. बरकत येतीया, तुमी ज्याला हातानं द्याल त्याला.
**पाटलीण :** मी... मी कसं पोतं उचलणार?
**दाजीबा :** गावकरी ओटीवर पोतं आनतील; त्याला त्यानी पाठ लावली की तुम्ही तुमच्या हातानं पोतं त्याच्या पाठीवर लोटायचं.
(प्रत्येकाच्या पाठीवर पोतं सरकवत पाटलीणबाई – हे दृश्य छाया प्रकाशाच्या साह्याने गतीने घेणे. नंतर उजव्या भागात प्रकाश. डाव्या भागात अंधुक प्रकाश. एका गरीब स्त्रीची झोपडी.)
**सारजा :** पोरे, तुजं नशीब उजळ म्हणून चांगली पिवळी हुतीया तू.
**तरूण मुलगी :** आये, आता काळजी दूर झाली नव्ह तुझी? समदं ठीक हुईल. आजाबात फिकीर करू नगं.
(दरोडेखोराच्या वेशात एकजण धावत प्रवेश करतो.)
**दरोडेखोर :** सारजा, घे पैका अन् हे दोन दागिने. कमळीच्या अंगावर घाल. (थैली पुढं करता) कुठवर आलंय कमळीच्या लग्नाचं?
**सारजा :** नगं मला तुमचा पैका अन् डाग! कमळीच्या लग्नाची येवस्था झालीय.
**दरोडेखोर :** आं? तुबी दरोडा घातला काय?
**सारजा :** आसलं वंगाळ काम जल्मात करायची नाय मी.
**दरोडेखोर :** मंग कुठुन आनंला एवढा पैका? डबोलं घावलं की काय तुला? सांग तरी समदं.
**सारजा :** ती एक चित्तरकथा हाय. बसा वाईच. दोन घास खा. मग सांगते.
**दरोडेखोर :** नगं मला जायला पायजेल. गुळपाणी दे अन् झटपट सांग.
**सारजा :** (कोपऱ्यातून गूळपाणी आणून पुढे ठेवते.) धनी, कमळीच लगीन ठरलं. तिच्या मामानं जमवून आणलं, मोट्ठी मानसं भेटली. पोरगा लई बक्कळ शिकलाय. मामलेदार कचेरीत कामाला हाय. तवा पाव्हण्या–मानसानं 'पोरीच्या अंगावर पाच तोळं सोनं घाला' म्हटलं. मी वो कुटुन आननार एवढं सोनं? तुमी असं सैरभैर फिरनार. मी तर हातपायच गाळले पगा. पर भाऊ म्हनला, 'त्याच्या गावच्या पाटलीणबाई म्हणजे साक्षात माऊलीच. त्या नक्कीच कायतरी मार्ग दावतील.'




**दरोडेखोर :** मंग पुढं काय झालं?
**सारजा :** उल्हासवाडीला जाऊन आम्ही त्यांना गाऱ्हानं सांगितलं अन् म्हनाले, 'माऊली, तुमी मदतीचा हात दिला तरच माजी कमळी उजवली जाईल.' तर आईसाबानी आक्रितच केलं.
**दरोडेखोर :** असं केलं तरी काय त्यांनी?
**सारजा :** आत्ता ग बया, आईसाबनी त्येंचे दोनी हात फुडं केलं अन् त्या म्हनाल्या, 'हं केलं मदतीचे हात पुढे.' मी बघत राहिले. कांही उमजना तवा पाटलीणबाई म्हणजे आईसाब म्हनत्यात कशा, 'अग, तुला पाहिजे तेवढे माझ्या हातातले दागिने घे'. ते ऐकलं अन् माऊलीचं आभाळाएवढं मन बघून म्या रडाया लागली. माऊलीला दंडवत घातला.
**दरोडेखोर :** (हात जोडून लांब नमस्कार करत) त्या माऊलीला माझा बी दंडवत.

**सारजा :** मी फकस्त सोन्याची एक बांगडी काढली. बांगडी काढताना माऊलीच्या हातावर मोठी थोरली बेलाच्या पानाची जलमखूण दिसली. त्यांच्या हातावर बांगडी ठेवून म्हटलं तुमच्या हातानं द्या. लई यश हाय तुमच्या हाताला. माऊलीनं हसत आनंदानं तसं केलं. आता कमळीच्या लग्नाचा बार झोकात उडवते पगा... पर तुमी कसे येणार त्या वक्ताला?

**दरोडेखोर :** लगीन लागायच्या वेळी नक्की देतो. परंतु पोरीला लांब उभं राहून आशिर्वाद दिन. पोलीस हैती ना माझ्या पाळतीवर.

**सारजा :** धनी, एक मागू कां?

**दरोडेखोर :** एक का दहा डाव माग. कापडचोपड पायजेल कां?

**सारजा :** नगं (रडत) काय बी नगं. समदं हाय. आपल्या पोरीच्या अंगावर त्ये तसलं चोरीचं कापडचोपड नगं की डागिने नगं. हे घेऊन जा तुमी. (थैली परत करत हात जोडून) पाया पडून पदर पसरते... तुमी हे वाईट वंगाळ काम सोडून द्या. तो लाख मोलाचा आशीर्वाद हुईल पोरीला.

**दरोडेखोर :** नाई, तरीबी मानसं जवळ करत्याल याचा ईस्वास वाटत नाही. भ्या वाटतं. परतीची वाट बंद झालीया. येतोऽऽ खंडोबा जसं ठिवील तसं राहीन. जातो! (प्रकाशात पाटलाच्या वाड्याचे दृश्य-उजव्या भागात अंधुक प्रकाश)

**पाटलीण :** सकाळपासून उजवा डोळा चार वेळा लवलाय. शकुन चांगला नाही.

**पाटील :** तुम्हा बाई माणसांचं, असलंच कांही तरी असतं. अंधश्रद्धा याचं नाव.

**पाटलीण :** असू दे. जगदंबामातेच्या कृपेने वाईट होऊ नये, अशी हात जोडून मी प्रार्थना करते.

**पाटील :** (हसत) प्रार्थना करा, साकडं घाला. आमचं काही म्हणणं नाही. (पडद्यामागून घोड्यांच्या टापांचा आवाज) नंतर.. उजव्या भागात पाठीला बंदूक, हातात कुऱ्हाड, डोक्यावरच्या फेट्याने तोंड झाकलेले अशा वेशात ५-६ जण आपल्या सरदारासह प्रवेश करतात)

**सरदार :** (मोठ्याने) पाटील गुमान दार उघडा! (जोरजोराने दार ठोठावत. एक जण, एका दगडाला कागद गुंडाळून वाड्यात टाकतो.)

**नोकर :** धावा, धावा, पाटील धावा (पाटील, त्याचे दोन मुलगे, पाटलीणबाई, दोनचार नोकर येतात)

**पाटील :** अरे, काय झालं बोंबलायला?

**नोकर :** ह्ये बगा दगड, असा दगड दरोडेखोरच टाकत्यात... (दगड पाटलाच्या हाती देतो. पाटील कागद काढून वाचतात.)

**पाटील :**'पाटील, तुझ्या वाड्यावर दरोडा घालायला आलो आहोत-'

**भिवा :** ए बंदूक आणा रे माझी. तुम्हीदेखील काठ्या, कुऱ्हाडी घेऊन या. बघतो एकेकाला.

**सरदार :** पाटील, गुमान तिजोरीतला पैका अडका एका चादरीत गुंडाळून चादर बाहेर फेका. नाय तर...

**पाटील :** काय करशील रे भेकडा. पैसा काय तुझ्या बाचा आहे?

**सरदार :** तिजोरी फोडली की कळंल कुणाच्या बाचा हाय ते!

**पाटील :**अरे जा, धमकी कुणाला देतोस?

**सरदार :** तुला, सांगतो तसं ऐक नाहीतर दार उघड. बघतो तुझ्याकडं.

**पाटील :** अरे ये, मी देखील मेल्या आईचं दूध प्यालो नाही.

**सरदार :** हा बघ, आलो. (तेवढ्यात पाटलीणबाई दाराला पाठ लावून उभ्या राहतात.)

**पाटलीणबाई :** खबरदार, कुणी दार दघडलं तर! अजय, ह्या घे तिजोरीच्या किल्ल्या अन् तिजोरीचं दार उघड. एका चादरीत सगळ्या नोटा, रुपये गाळा कर. चादरीचं गाठोडं कर अन् फेक वाड्याबाहेर.

**पाटील :** अग, काय सांगतीस त हे. ह्यामुळं माझी छी थू होईल, 'पाटील भेकड' अशी निंदा नालस्ती होईल.

**पाटलीणबाई :** (केविलवाणे) हे पाहा, ते मला काही सांगू नका. दरोडेखोर आत आले त्यांनी दोघाचौघांचे मुडदे पाडले तर...

**पाटील :** आम्ही काही कच्च्या गुरूचे चेले नाहीत. आम्हीही दोघाचौघांना स्वर्ग दाखवून.

**पाटलीणबाई :** (रडत) अहो, असं काय करता? काय चाटायचंय त्या सोन्याला... बायकांचा खरा दागिना त्यांचं सौभाग्य. तुम्ही आहात तर बाकी सगळ्याला मोल आहे.

**पाटील :** भेकडाचं जगणं नकोय मला... दूर हो (दार उघडायला

जातात, पाटलीणबाई उघडू देत नाही. झटापटीत त्यांचा हात दारात अडकतो.)

**पाटील :** तू ऐकणार आहेस की नाही?

**पाटलीणबाई :** मुळीच नाही. (रडत) हा माझा अजय, माझा विजय सोन्यासारखी ही पोरं. त्यांच्यापेक्षा का पैसा मोलाचा आहे?

**पाटील :** तुम्हा बायकांची धाव चुलीपर्यंतच.

**पाटलीणबाई :** असं मुळीच समजू नका. थोर स्त्रियांची नांव मी तुम्हांला सांगितली पाहिजे असं नाही. तुम्हांला ठाऊक आहेतच.

**पाटील :** हो ना ! पण मग अशी हातपाय का गाळतेस?

**पाटलीणबाई :** व्यवहार (दरोडेखोर बाहेरून दार ढकलत आहेत.)

**सरदार :** पाटला, भेकडा दार उघड.

**पाटील :** ऐकतेस ना, माझी संभवना कुठल्या शब्दात होतेय ते!

**पाटलीणबाई :** होऊ दे.

**पाटील :** माझी निंदा झाली तर तुला चालेल. पण मला चालणार नाही. असलं अपमानित जगणं काय कामाचं? त्याऐवजी आत्महत्या करून अथवा लढून मरण आलेलं चालेल.

**पाटलीणबाई :** तुमचं ठीक आहे तुमचा तुमच्या जीवावर हक्क. मी कोण तुमची? मुलं तुमचीच. वडील आहात तुम्ही त्याचे. आईला कोण विचारतो?

**दरोडेखोर :** पाटील, दार उघड बाईमागे दडू नको.

**पाटील :** ऐक.

**पाटलीणबाई :** ऐकत्येय. अहो पण ही वाड्यावरची चाकरमानी माणसं; त्यांची कोण काळजी घेणार? त्यांच्या मुलाबाळांचं काय? तुमच्या वाड्यावरचे नोकर हा काय त्यांचा गुन्हा? त्यांचा तरी विचार करा. का तुमचाच अहंकार गोंजारणार आहात?

**पाटील :** ते काही मला सांगू नको. उघडतो मी दार, हो दूर.

**पाटलीणबाई :** मुळीच नाही तसं... मी पुरा बंदोबस्त करते. अजय इकडे ये (अजय त्यांच्याजवळ जातो त्याची तलवार हिसकावून घेत.) हे दारच पक्के बंद करते. (तलवारीने स्वत:च्याच डाव्या हातावर घाव घालतात. दाराबाहेर हात तुटून पडतो. दार पूर्णबंद होते)

**अजय :** आई, काय केलसं हे?

**सरदार :** दार पक्क बंद झालं. आता काय करायचं?

**दरोडेखोर :** अरे, पण हे काय? हा हात तुटलेला आहे.

**सरदार :**कुण्या बाईचा दिसत्योय. हातात सोन्याची एक बांगडी दिसतेय. आश्चर्यच आहे. बाईच्या हातात दोन नाहीतर चार बांगड्या असतात.

**दरोडेखोर :** हो ना.

**सरदार :**अन् हे बघा! हातावर काळी जन्मखूण आहे. बेलाच्या पानावानी हाय.

**दरोडेखोर :** काय बेलाच्या पानाचा आकार!

**सरदार :**व्हय, रं!

**दरोडेखोर :**अरे देवा, हे काय घडलं! ज्या माऊलीनं माझ्या पोरीच्या डोस्क्यावर मायेचा हात ठेवला त्या माऊलीला आमच्यामुळं हात तोडावा लागला? सरदार, आपण कुठल्या गावात आलो आहोत?

**सरदार :** उल्हासवाडीत!

**दरोडेखोर :** ऑ, काय म्हनता, अरं देवा, हे तर लई वंगाळ झालं. सरदार, माझी विनंती आहे. आपण परत जाऊ या. नाहीतर देवाच्या घरावर दरोडा घातल्यासारखं हुईल.

**सरदार :** का रं बाबा, असं का हातपाय गाळतोस?

**दरोडेखोर :** सरदार, माझी विनंती ऐका. नाही म्हणू नगा. माझ्या मुलीच्या लग्नासाठी या माऊलीनं ह्या ह्याच हातातली एक बांगडी दिली हाये. माझं ऐका, निघा.

**सरदार :** ठीक आहे. तुझ्यासाठी माघार फिरतो. पर आजवर कंदी असं केलं नाही.

**दरोडेखोर :** मायबाप, तुमचं लई उपकार (सरदार व साथीदार जातात. तुटलेला हात दोन्ही हातात पकडून स्वत:च्या मुस्कटात मारून घेत.) आईसाहेब, चुकलो मी. माफ करा. माफ करा मला. मी पापी आहे. आता मी पोलीसंच्या स्वाधीन होणार. माफ करा! माफ करा... (मुस्काटात मारून घेत असताना पडता)

* प्रयोगापूर्वी लेखकाची आगाऊ लेखी परवानगी आवश्यक.


●●

---

**दत्ता श्री. टोळ**
स्वरांजली, साहित्य परिषदेसमोर
पुणे ३०

# चला प्रतापगडावर

गौरव होंबाळी



मित्रांनो, तुम्ही ‘प्रतापगड’ हे नाव ऐकलेच असेल. काहींनी तो पाहिलाही असेल. मात्र काहींनी नुसते नावच ऐकले असेल, म्हणून मी आज तुम्हाला प्रतापगडाची सफर घडवणार आहे.

श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या तेजस्वी, प्रतापी स्वराज्याची मुहूर्तमेढ येथेच रोवली. आपल्या तळपत्या खड्गाचे पाणी शत्रूला येथेच पाजले. महाराष्ट्रातील इतर किल्ल्यांच्या मानाने हा किल्ला अर्वाचीन असून,पराक्रमी दुर्ग मंडलात मात्र तो एक तेजस्वी गड आहे. प्रतापगड जिंकण्यास आलेल्या खानाला, महाराजांनी येथेच फार मारले. या गडाखाली अजूनही पुरातन काळातील काही गावे आहेत. उदा. ‘पार’ गावानजिक, देवीचे एक पुरातन मंदिर आहे. ही देवी लिंगायत पंथाची कुलस्वामीनी आहे. श्री समर्थांनी अफजलखानाचा नि:पात व्हावा यासाठी या देवीला साकडे घातले होते. अनेक वर्षांपूर्वी, तिची श्री रामचंद्रांनी पूजा केली होती व तिचा वर घेऊनच ते लंकेच्या स्वारीवर गेले होते, अशी आख्यायिका आहे. म्हणून या देवीला ‘रामवरदायिनी’ म्हणतात.

‘वाडा’ या गावाच्या शिवारातून, प्रतागडाची चढण चढण्यास सुरू करू. सभोवती महाबळेश्वरची शिखरे व डाव्या बाजूस ‘ढोरप्या’ किंवा ‘भोरप्या’चा डोंगर म्हणजेच ‘प्रतापगड’ दिसतो. चढणीपासूनच, गडावरील भवानी मातेच्या मंदिरापुढील दोन दीपमाळा दिसतात.

गड चढण्यास सध्या जरी पायऱ्या असल्या तरी शिवरायांच्या काळी, डोंगरावर चढून गडावर जावे लागे. पायऱ्यांच्या सुरूवातीस एक गुहा दिसते. अफजलखानाच्या भेटीस जाताना, अफजलखान नक्कीच दगा फटका करेल याची शिवरायांना खात्री असल्याने, त्यांनी या गुहेत चाळीस मावळे लपवून त्यांना सांगितले होते की, ‘‘माझ्या जीवाचे काही बरे वाईट झाले तरी गडाचे अफजलखानापासून संरक्षण करा.’’ सन १९५७ मध्ये जेव्हा भारताचे पहिले पंतप्रधान पं. नेहरू यांनी प्रतागडास भेट दिली, तेव्हा त्यांच्यासाठी रस्ता बांधण्यसाठी, खडी फोडल्याने ही गुहा बरीचशी बुजली आहे.


आता आपण गडावर चढण्यास प्रारंभ करू. पंधरा पायऱ्यानंतर अजूनही सुस्थितीत असलेला गडाचा मुख्य दरवाजा दिसतो. हा दरवाजा आजही सूर्यास्तानंतर बंद होतो व सूर्योदयापूर्वी उघडला जातो. पुढे

गेल्यावर एका माचीवर एक बुरूज दिसतो. हा पहिला टेहळणी बुरूज. पुढे गेल्यावर भवानी मातेच्या मंदिरात जाण्यासाठी प्रवेशद्वार लागते. मंदिरासमोर पाहिल्यास, टेहळणी बुरूजावर उभारलेला खांब स्पष्ट दिसतो. शिवरायांनी ''अफजलखानाच्या मुंडक्याचा प्रसाद तुला तीन दिवस देईन'' अशी प्रतिज्ञा भवानी मातेजवळ घेतली होती. त्याचप्रमाणे तीन दिवस अफजलखानाचे मुंडके त्या खांबावर लटकवण्यात आले होते. ते मुंडके नंतर जिजामातेस दाखविण्याकरिता राजगडावर नेण्यात आले. त्यामुळे अफजलखानाच्या मुंडक्याची कबर राजगडावर तर धडाची कबर प्रतापगडावर आहे.

भवानी मातेच्या मंदिराचे प्रवेशद्वार ओलांडून वर गेल्यास, तेथे एक शिवाचे मंदिर लागते. त्या जागी शिवरायांनी प्रथम भवानी मातेचे मंदिर बांधण्यास सुरुवात केली होती, परंतु तेथे त्यांना शिवाची स्वयंभू मूर्ती सापडल्यने तेथे शिवाचे मंदिर बांधून, भवानी मातेचे वेगळे मंदिर बांधण्यात आले. या मंदिरापुढे सदर म्हणजेच मोकळी जागा आहे. याच सदरेत महाराजांनी एक कठोर हुकूम सोडला होता. त्याची हकिकत

हैबतराव सिलिमकरांचे सासरे म्हणजेच शिवरायांचे मामा, खंडोजी खोपडे प्रथम स्वराज्यात चाकरी करीत होते. पुढे अफजलखानाच्या अस्मानी वादळापुढे ते नमले व सरळ अफजलखानाच्या सैन्यात दाखल झाले. ही कातडी बचावूवृत्ती, हरामखोरी समजून महाराज चूप बसले. मात्र नंतर खोपडेंनी, अफजलखानाचा मुलगा फाजलखान यास फितून होऊन ऐन युद्धात विजापूरची वाट दाखवली. हा स्वराज्यद्रोह महाराजांना खपला नाही व पुढे याच सदरेत खंडोजी खोपडे यांचा उजवा हात व डावा पाय तोडा असा हुकूम दिला. आपण उजव्या हाताने तलवार चालवतो म्हणून उजवा हात तर घोड्यावर चढताना प्रथम डावा पाय ठेवतो म्हणून डावा पाय तोडला. हे सर्व जेथे झाले ते सर्व शिवाला साक्षी ठेवून झाले. हे शिवमंदिर बालेकिल्ल्यात येते.

आता मंदिराच्या मागच्या बाजूने सरळ चालत जाऊ. चालताना, अर्धगोलाकृती बांधलेला एक कडा आपणास दिसेल. हर कडेलोट करायचा असेल त्याला पोत्यात बांधून या कड्यावरून टाकण्यात येई. या कड्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या कड्यापुढचा भाग रायगड जिल्ह्यात तर कडा सातारा जिल्ह्यात येतो. आपण आपला हात या कड्यावरून लांब केल्यास, आपला हात रायगड जिल्ह्यात व बाकी शरीर सातारा जिल्ह्यात, अशी अवस्था होते. या कड्यावरून कोयना व सावित्री या नद्या दिसतात.



पुढे गेल्यावर, बागेत जाण्यासाठी लागणाऱ्या पायऱ्या दिसतील. या बागेत शिवरायांचा भव्य पुतळा उभारला आहे. या पुतळ्याच्या हातात उंच धरलेल्या तलवारीच्या टोकापासून खालपर्यंतची उंची ३५ फूट आहे, तर फक्त पुतळ्याची उंची १६ फूट आहे. हा पुतळा सन १९५७ मध्ये पं. नेहरूंनी प्रतापगडाला भेट दिली, तेव्हा बांधण्यात आला व

नेहरूंच्या हस्ते याचे उद्घाटन करण्यात आले. ''शिवरायांचे कर्तृत्व इतके महान आहे की त्याची तुलना जगज्जेत्या अलेक्झांडरशीच होऊ शकेल.'' असे शब्द त्याकाळच्या गोव्याच्या पोर्तुगीज गव्हर्नरने पुतळ्यावर कोरले आहेत. किल्ल्याकडे जातानाच रस्त्यात अफजलखान व सय्यद बंडा यांच्या कबरी बांधलेल्या दिसतात. त्यावरुन शिवरायांनी आपल्या शत्रूचादेखील मान राखला आहे, हे दिसून येते.

प्रतापगड, हा समुद्रसपाटीपासून ३५०० फूट उंचीवर आहे. या गडाचा तटच ४ कि. मी. लांब आहे. परंतु, या गडाचे अभियंता, मोरोपंत पिंगळे, यांच्या देखरेखीखाली एवढा मोठा गड केवळ दोन वर्षात बांधण्यात आला.

या गडाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, या गडाला इतकी वर्षे होऊन देखील हा गड सरकारच्या ताब्यात नसून शिवरायांची बारावी पिढी कल्पनाराजे भोसले यांच्या ताब्यात आहे.

आज तुम्ही माझ्या डोळ्यांनी प्रतापगड पाहिलात. आवडला ना? जरूर कळवा.

●●

**गौरव होंळाबी**, इ. ९वी.,
१०४/अक्षयसागर अपार्ट.
संत नामदेव पंथ, डोंबिवली (पूर्व)

# कविता पानोपानी

## अर्घ्य

गांजल्या डोळीयांत आगळे दृश्य दाटे
तमाच्या वेटोळ्यात तेजाला कोंब फुटे
न कळे भुईपोटी पेरीली बीजे कोणी
व्यापिली भुई सारी तमाच्या रोपट्यांनी
जागून आले कोणी ऐकून सळसळ
म्हणती– निपटाया हवा हा खळमळ
कितीक जन आले तयांना साथ द्याया
अभद्र जंगल ते पूर्वेला हटवाया
पूर्वेला उघडला तेजाचा लाल डोळा
पाहिला चहूकडे काळोख व्यापलेला
माजली झुंज मोठी तेजाची तिमिरासी
जळून राख झाली अवघी तमोराशी
तेजाला अर्घ्य द्याया यारे या सारेजण
प्रकाश पूजण्याची घ्यायची आहे आण

**संजीवनी मराठे**
१६ सुखनिवास, १०२/२ ए, शिवाजीनगर, पुणे १६.

## सांगावा

फुलांची बाग ही नाही, इथे काटेच रुतलेले
तुम्हा सोडून या देशी आम्हाला जायचे आहे
इथे सत्यास ना वाचा आणि हा न्याय अंधांचा
अशा देशात आयुष्य तुम्हा फुलवायचे आहे.
कधी काळी इथे होती झळाळी मानवी मूल्याची
आम्ही त्या धूळ दाविली तुम्हा सांगायचे आहे.
सर्व ते सोडून गेले जयांनी बाग फुलविली
आम्ही माळी असे ज्यांना फुला किडवायचे आहे.
आता निष्पाप हातांनो खड्ग अमुच्यावरी रोखा
नव्याने राष्ट्र जर तुम्हा इथे घडवायचे आहे.
जपा ही शुद्ध हृदये अन् जपा हा वारसा प्राचीन
मध्ये मळली नदी तिजला तुम्ही विसरायचे आहे.

**राजलक्ष्मी देशपांडे**
११ चिरानी, आम्रपाली अपार्टमेंट,
सर्व्हे नं. ६६८, बिबवेवाडी, पुणे ३७

# अनुभव - समृद्ध करणारी तंबूतील शिबिरे

**मुलांचे शिबिर :**

**स्थळ :** कानंद **उपस्थिती :** ४५

(३ ते ९ नोव्हेंबर ९७, निवासी)

१३ गावांमधील विद्यार्थी ३ नोव्हेंबरला ज्ञान प्रबोधिनीत एकत्र जमून, लगेचच पुण्यापासून ७५ कि.मी. वर असलेल्या, डोंगराच्या कुशीतील 'कानंद' या गावाला रवाना झाले. शिबिराच्या ठिकाणी पोहोचायला बरीच रात्र झाली. मुख्य गावापासून आतमध्ये ५-६ कि.मी. अंतर रात्री अंधारात चालावे लागले. शिबिराच्या ठिकाणी या सर्वांच्या स्वागतासाठी तंबू सज्ज होतेच. सर्वांनी गरमागरम पिठलं - भाताचे जेवण आटोपले. मग सर्वांची ४ गटांमध्ये विभागणी केली गेली. तानाजी, येसाजी, बाजीप्रभू आणि मुरारबाजी अशी त्या गटांना नावे देण्यात आली. सूचना सांगून झाल्यावर, सर्वजण झोपी गेले. दुसऱ्या दिवसापासून सकाळी ५.३० ते रात्री १०.०० असा भरगच्च अन् छान दमवणारा दिनक्रम होता. उपासनेने दिवसाला प्रारंभ होत असे. नंतर चेतना व्यायाम, मारामारीचे खेळ, बरची नृत्य असा दमवणारा कार्यक्रम असे. न्याहारीनंतर, ग्रामीण भागातील जनजीवन, प्रश्न व त्यावरील उत्तरे यावर आधारित व्याख्याने, गावकऱ्यांशी गप्पा, चर्चा असा कार्यक्रम असे. निसर्ग सान्निध्यात चित्र काढणे, सूक्ष्मदर्शकाच्या सहाय्याने निरीक्षण करणे, कथा-काव्य लिहिणे, असे पुढचे सत्र असे. त्याभागात बांबू मोठ्या प्रमाणावर असल्याने, त्यापासून आकर्षक भेटकार्डे तयार करण्यासाठी, स्थानिक कलाकारांना बोलावले होते. सर्व विद्यार्थ्यांनी १-१ भेटकार्ड तयार केले. नंतर नदीमध्ये मनसोक्त डुंबणे-पोहणे-भोजन-विश्रांती असा मजेचा भाग असायचा. दुपारची झोप, पद्यगायन सत्राने उडायची. गटचर्चेमध्ये, 'मी व माझा परिसर', आणि 'माझी पुढची ५ वर्षे' यावर गटागटामध्ये खूप मनमोकळ्या गप्पा-चर्चा झाल्या. संध्याकाळी चुरशीचे, खेळांचे सामने असायचे. त्यानंतर जोशपूर्ण स्फूर्तिगीते अन् स्थानिक कार्यकर्त्यांचे अनुभवकथन असायचे. जेवणानंतर बाहेरची थंडी अन् दिवसभराची दमणूक यामुळे, केव्हा एकदा तंबूत जाऊन पांघरूणात स्वत:ला लपेटून घेऊ असे व्हायचे.दिवसाचा शेवट, दिवसभराचा आढावा, गटश: कामांबाबत व अन्य सूचना व प्रार्थना करून व्हायचा. एक पूर्ण दिवस मुले गटागटाने गावांमध्ये गेली होती. भात कापणी करणे, मुलांना गोळा करून त्यांचे खेळ घेणे, त्यांना गाणी शिकविणे, घरी जाऊन विविध माहिती, प्रश्न विचारणे, देवळात मुक्काम अन् भल्या पहाटे काकडआरतीचा अनुभव, असे विविध अनुभव घेऊन मुले परत आली. अनेक प्रश्नांना सामोऱ्या जाणाऱ्या ग्रामीण जनतेचे मन किती मोठं आहे, याचा विलक्षण प्रत्यय सर्वच ठिकाणी मुलांना आला.

### आठवणी शिबिराच्या

शाळा सुरू झाली. पण एकही क्षण शिबिराच्या आठवणींशिवाय जात नाही. नदीतलं डुंबणं, एकमेकांबरोबर शर्यती लावणं, वाढपव्यवस्थेची धांदल उडवून देणं. तंबूत आपापली कामे चालू असताना, अचानक शिट्टी वाजली की सर्वांना तंबूबाहेर सावधान स्थितीत उभे राहावे लागे. त्यावेळी तर प्रत्येकाची मजा बघावयास मिळे. कोणाच्या एकाच पायात बूट तर कुणाच्या एका पायात नुसता मोजा तर कोणाचे केस विस्कटलेले.

ट्रेकिंगच्या वेळी तोरणा चढताना सर्वांचे चेहरे रडवेले झाले होते; पण मोठ्यांच्या मार्गदर्शनाने आमच्यात एक नवी शक्ती संचारली व तोरणा चढलो. वाट चुकलेलो असताना परत एकत्र आल्यावर जीवात जीव आला. असे शिबिर अजन सात दिवस असतं तर दुप्पटीने अनुभव घेतले असते.

**- अद्वैत उमरीकर,** अकोला

४ दिवसांच्या भरगच्च शिबिरानंतर तोरणा ते राजगड अशी सहल झाली. पहिल्यांदाच गड चढणारे अनेकजण, बरोबरच्या पिशवीचे बंद तुटलेले, वजनदार सामान या सगळ्या अडचणींबरोबर उघड्यावरचे झोपणे, अर्धवट खाणे अशा अनेक संकटांवर मात करत-प्रसंगी रडत-ओरडत पण सर्वजण जिद्दीने तोरणा ते राजगड चालले. राजगडावर पोहोचल्यावर मात्र सगळ्यांमध्ये प्रचंड उत्साह संचारला. गडावर पोहोचल्यावर सर्वांनी आपापल्या गटात स्वयंपाक करून जेवणं केली. उतरताना ३-३।। तास लागेल असे अंतर सर्वांनी फक्त २ तासात पूर्ण केले. सर्वच शिबिर अन् सहल विलक्षण अनुभव-समृद्ध करणारी झाली. या वृत्तातून शिबिराची केवळ झलक समजेल. त्यातले बारकावे अन् दररोज येणारे असंख्य छोटे मोठे अनुभव, जे प्रत्यक्ष शिबिरात होते त्यांच्याकडे मात्र आयुष्यभर राहतील, यात शंकाच नाही.

**अजय शेलार,** ज्ञान प्रबोधिनी, युवक विभाग, पुणे

**मुलींचे शिबिर :**

**स्थळ :** आंबवणे, **उपस्थिती :** ३१

(३ ते ९ नोव्हेंबर ९७, निवासी)

११ गावांहून या मुली ३ तारखेलाच संध्याकाळी पुण्यापासून ५० कि.मी.वर असलेल्या आंबवणे गावात पोहोचल्या. शिबिराचा दिनक्रम चांगलाच भरगच्च होता. उपासना, गटचर्चा, गटकार्य, कथाकथन, अनुभवकथन, अभिव्यक्ती मुक्तसत्र, खेळ इ. कार्यक्रमांनी दिवस कसा संपायचा कळायचेच नाही.

'मी मुलगी आहे म्हणून...' व 'तर मला भीती वाटते' या दोन्ही विषयांवरील गटचर्चा खूप रंगल्या. सगळ्याजणी मोकळेपणाने बोलल्या. एकमेकींचे विचार अनुभव ऐकून, कधी हसायला यायचं तर कधी गंभीरपणे विचार करायला लावायचे. खेळीमेळीच्या या चर्चा बरचं काही शिकवून गेल्या. अगदी नकळतपणे...

नियोजनबद्ध किल्ला तयार करण्याचे व खजिन्याचा शोध घेण्याचे गटकार्यही चांगलं झालं. परस्परांबरोबर कमी



वेळामध्ये अनेक प्रकारच्या कल्पना काढताना व प्रत्यक्ष कामे करताना खूपच मजा आली.

अनुभव कथनामध्ये वेल्हे येथे वैद्यकिय व्यवसाय करणारे डॉ. नरेंद्र थेटे, ज्ञान प्रबोधिनी प्रशालेचे प्राचार्य विवेक पोंक्षे, ज्ञान प्रबोधिनीच्या ग्रामविकसन विभागामध्ये महिलांच्या बचतगटांचे काम करणाऱ्या कार्यकर्त्या कु. सुवर्णाताई गोंधळेकर व छात्र प्रबोधनचे संपादक श्री. महेंद्रभाई यांनी आपले ग्रामीण भागातील कामाचे अनुभव सांगितले. त्यातून ग्रामीण जीवन, तेथली माणसं, त्यांचे प्रश्न, त्यावर प्रबोधिनीने केलेली विकासाची कामे, दारुबंदी आंदोलन इ. संबंधीचे जिवंत चित्र मुलांसमोर उभे राहिले.

एकदिवस याच भागातील एक सर्पमित्र श्री. ननावरे यांनी एक वेगळेच सत्र घेतले. त्यामध्ये फुरसं, धामण इ. सर्पांची त्यांनी नुसती माहितीच सांगितली नाही तर ते



शिबिरातील अनुभवकथन

मुलींच्या हातातही दिले.

रात्री प्रत्येक गटाला एक-एक दिवस रक्षणाची पाळी असायची. कोल्हेकुई, थोड्या अंतरावर असलेली स्मशानभूमी या पार्श्वभूमीवर रक्षकांनी मोठ्या धिटाईने आपले काम पूर्ण केले. रोज रात्री 'मातृमंदिरमे चलो प्रिय, हो रही है आरती' या प्रार्थनेने दिवसचा शेवट होई. एक दिवस रात्री, बांधलेला ढोल बघताच 'चला आज बरच्या (बरच्यानृत्य-प्रबोधिनीचे खास वैशिष्ट्य) करू या' असं कोणीतरी म्हटलं अन् मग बराच वेळ सगळ्या जणी क्रीडांगणावर बरच्या करत रंगून गेल्या.

ग्रामीण जीवनाचा जवळून अनुभव घेण्यासाठी ६ तारखेलाच मुली सांगवी, कुरुंगवाडी व आंबवणे गावामध्ये गेल्या. बरोबर जेवण दिलं होतं ते सर्वांनी तेथील गावकऱ्यांबरोबर खाल्लं. शेतातली कापणी, नांगरणी अशी कामे केली. घराघरात जाऊन त्यांच्याबरोबरच्या मुली, तसेच अन्य प्रौढ स्त्रिया, आजी यांच्याशीही विविध विषयांवर गप्पा मारल्या. प्रेमळ माणसांचा हा अनुभव व तेथील प्रश्न दीर्घकाळ लक्षात राहतील असेच होते.

एका मुलीला शिबिरामध्ये आईची फार आठवण येत होती. ती ज्यांच्याकडे गावात गेली होती तिथे छोटा मुलगा खेळत होता. लहान भावाच्या आठवणीने ती शिबिरार्थिनी लागली रडायला. पण आजींनी समजावलं. ''अगं ताई, ह्या पोराला तर आयच न्हाय, मग ह्यानं कुनाकडं बघायचं अन् कुणासाठी रडायचं?'' तेव्हा तिचं रडू कुठल्याकुठे पळालं.

शेवटचे २ दिवस सिंहगडावर सहल होती. कल्याण दरवाजाने गड चढताना काहींची खूपच तारांबळ उडाली होती. शारीरिक क्षमता खूप कमी पडते आहे. त्यासाठी रोजचा खेळ, व्यायाम करायला हवा, याची जाणीव त्यांना नक्कीच झाली. गड संपूर्ण हिंडलो. खूप खेळलो. गडावर मुक्काम केला. शिवाजी महाराजांचा, तानाजीचा इतिहास समजावून घेतला. अशा ठिकाणी त्या घटना एकदम जिवंत होऊन जातात. स्फूर्तिगीते म्हणून तो जोश-आवेश शब्दांसूरामध्ये व्यक्त करण्याचा प्रयत्न केला. एक हृद्य अनुभव!

दुसऱ्या दिवशी पुण्यात परतताना एक गट त्यांच्या ताईसह मागेच राहिला अन् सुमारे ९ कि.मी. चे अंतर चालून अखेर त्या पुण्यात पोहोचल्या. समारोपाच्या कार्यक्रमात मुलींनी आपले शिबिरातले अनुभव भरभरून सांगितले. प्रबोधिनीचे कार्यवाह मा. सुभाषराव देशपांडे यांनी मार्गदर्शन केले.


जेवणानंतर भारावलेल्या मन:स्थितीत प्रत्येकीने एकमेकींचा निरोप घेतला. एकत्र येऊन सातच दिवस झाले होते. पण विविधांगी अनुभवांमधून मुली खूपच एकमेकींच्या जवळ आल्या होत्या. त्यांची मैत्री व शिबिरातले अनुभव सर्वांनाच दीर्घकाळाची सोबत करतील असा विश्वास वाटतो.

●●

**कु. श्रद्धा तीर्थळी**
ज्ञान प्रबोधिनी, युवती विभाग, पुणे.

# मानवी यानाची मंगळावर झेप

डॉ. प्रकाश तुपे



पुरातन काळापासून मंगळाकडे भीतियुक्त औत्सुक्याने पाहिले जाते. दर सव्वीस महिन्यांनी, पृथ्वीजवळ आल्यावर मंगळ तांबूस व मोठा दिसू लागतो. दुर्बिणीतून त्याचे निरीक्षण केल्यावर, त्यावर दिसलेल्या रेषा पाहून तेथे प्रगत जीवसृष्टी असून त्यांनी बांधलेले 'कालवे' म्हणजेच त्याच्या 'पृष्ठभागावरील रेषा' असे काहींना वाटत होते. कथा–कादंबरीकारांनी मंगळाच्या जीवसृष्टीवर प्रचंड लिखाण करून 'मंगळावर जीवसृष्टी असावी' असं ठसविण्याचा प्रयत्न केला. मात्र अखेरीस मंगळावर १९७६ साली उतरलेल्या 'व्हायकिंग' यानाने मंगळ हा निर्जीव, निर्वात व जीवसृष्टी नसलेला, दगडधोंड्यांचा प्रदेश आहे, असे दाखवले. मात्र, गतवर्षी पृथ्वीवर सापडलेल्या एका पाषाणाने धमाल उडविली. अमेरिकन शास्त्रज्ञांच्या मते, हा पाषाण ३.६ अब्ज वर्षांपूर्वीचा असून तो मंगळावरून पृथ्वीवर फेकला गेलेला आहे. या पाषाणात मंगळावरील जीवसृष्टीचा अवशेष शास्त्रज्ञांना आढळला. या शोधाने मंगळाच्या संशोधनाविषयी नवीन चालना निर्माण झाली. आपले सरकार दर २६ महिन्यांनी मंगळाकडे याने पाठवील, असे अमेरिकेच्या राष्ट्राध्याक्षांनी जाहीर केले. पुढील दहा वर्षात दहा याने मंगळाकडे पाठविली जातील व २००५ साली, मंगळावरील दगड, माती पृथ्वीवर आणली जाईल.

एकंदर तीन याने, ९६ साली मंगळाकडे पाठविली गेली. सर्वप्रथम सात नोव्हेंबर ९६ रोजी 'मार्स ग्लोबल सर्व्हेयर' आकाशात झेपावले. त्या पाठोपाठ अवघ्या दहा दिवसात, रशियन 'मार्स ९६' आकाशात पाठविले गेले. सर्वांत शेवटी, २ डिसेंबर ९६ रोजी 'मार्स पाथ फाईंडर' पाठविले गेले. ही तीनही याने मंगळावरच्या जीवसृष्टीचा शोध घेण्यासाठी पाठवलेली नसून, कमी खर्चात पुढील मंगळावरच्या मोहिमा यशस्वी कशा करता येतील? व या मोहिमांची पूर्वतयारी म्हणून; ही याने मंगळाकडे रवाना केली गेली.

सर्वप्रथम 'मार्स पाथ फाईंडर'

मंगळाजवळ पोहोचले. शुक्रवार दि. ४ जुलै ९७ रोजी, भारतीय वेळेप्रमाणे, रात्री दहा वाजून दोन मिनिटांनी पाथ फाईंडर यान, मंगळाच्या वातावरणात, तासाला सव्वीस हजार किलोमीटर, इतक्या प्रचंड वेगाने घुसले. यानाने चौदा अंशाचा कोन करून मंगळाच्या 'अेरिस व्हॅलिस'नावाच्या भागाकडे झेप घेतली. मंगळावरील वातावरणामुळे त्याचा वेग किंचित कमी झाला. याच वेळी पॅराशूट उघडली गेली. त्यामुळे यानाचा वेग चांगलाच कमी झाला. यानाची उष्णताविरोधी कवचे गळून पडली. वेग नियंत्रणासाठी रॉकेटचा वापर करण्यात आला. यानाभोवती असलेल्या हवेच्या चार पिशव्या फुगू लागल्या व त्यांनी वेढलेले यान मंगळाच्या पृष्ठभागावर अलगद पडले. हवेच्या पिशव्यांमुळे यानाने पन्नास फूट उंच उसळी घेतली व पुन्हा एकदा ते जमिनीवर पडले. दहा-पंधरा उड्या मारीत यान भूपृष्ठावर घरंगळत जाऊन अडीच मिनिटांनंतर ते शास्त्रज्ञांना हव्या असलेल्या स्थितीत स्थिरावले. मंगळावर उतरल्या क्षणी यानाने पाठविलेला संदेश, स्पेनमधील अवकाशयंत्रणेने टिपला. नासाच्या, पासादेनामधील कार्यालयात हा संदेश मिळाल्यावर, तेथे जमलेल्या शास्त्रज्ञांनी आनंदोत्सव सुरू केला.

'पाथ फाईंडर' उतरल्यानंतर शास्त्रज्ञ आतुरतेने, मंगळावर सूर्योदय होण्याची वाट पाहू लागले. सूर्योदयानंतर त्यांना पाथ फाईंडर कडून, मंगळाचे पहिले छायाचित्र अपेक्षित हाते. चार तासांनी मंगळावर सूर्योदय झाला. मुख्य यानाचा कॅमेरा उभारला गेला. त्याने सूर्याला शोधले व त्याच्या साह्याने यानाच्या अँटिनाला पृथ्वीकडे वळविले. यान जेथे उतरले होते, त्या भागाची छायाचित्रे काढली गेली व ती पृथ्वीकडे पाठविली गेली. अवघ्या दहा मिनिटात ही छायाचित्रे पृथ्वीवर पोचली. नासाने काही वेळातच ती जगभरातील दूरचित्रवाणी संचावर दाखविली. मंगळावरून पाठविलेल्या पहिल्या छायाचित्रात यानाच्या तिन्ही पाकळ्या उघडल्या गेल्याचे दिसले. मुख्य यान (लँडर) मंगळाच्या पृष्ठभागावर दगडधोंड्यांमध्ये उभे होते. तांबूस रंगाचे क्षितिज व मैलभर अंतरावर असलेल्या दोन पर्वतरांगा छायाचित्रात स्पष्ट दिसत होत्या.

५ जुलै, म्हणजे यानाचा दुसरा दिवस. काल बग्गीला मंगळावर उतरविता न आल्याने, आज सर्वप्रथम बग्गी मंगळाच्या पृषठभागावर उतरविण्यासाठी पृथ्वीवरून संदेश पाठविले गेले. दहा किलो वजनाच्या व सव्वा दोन फूट लांबीच्या बग्गीने, आपली उंची वाढवून सात इंचाएवढी केली. बग्गीची, पाच इंच उंचीची अॅल्युमिनियमची सहा चाके, मंगळाच्या पृष्ठभागावर उतरण्यास सज्ज झाली. यानाच्या पाठीमागच्या भागात तयार केलेल्या, एक मीटर लांबीच्या उतारावरून



बग्गी हळूहळू पृष्ठभागाकडे सरकू लागली. एका पाठोपाठ एक चाक, पृष्ठभागावर आपला ठसा उमटवीत हळूहळू पुढे सरकू लागले. अर्ध्या तासात सहाही चाके मंगळावर उतरली. बग्गीने एक दोन वळसे घेऊन, मंगळाच्या पृष्ठभागाचा अंदाज घेतला आणि मोहिमेचा एक अवघड टप्पा यशस्वीरित्या पार पडला. बग्गीने तातडीने आपल्या चाकाजवळ असलेल्या पृष्ठभागाचेनिरीक्षण चालू केले. जवळच असलेल्या 'बार्नेकल बिल' व 'योगी' नावाच्या दगडाचे प्राथमिक निरीक्षण केले.

'पाथ फाईंडर' मिशनने मंगळावरील छायाचित्रे व निरीक्षणे शास्त्रज्ञांना मिळाली. 'बार्नेकल बिल' हा क्वार्ट्झ असलेला छोटासा दगड पाहून, मंगळावर पुरातन काळी बरेच उत्पात घडले असावेत, असे वाटते. ज्वालामुखींनी व अशनींनी पृष्ठभागावर आपल्या अस्तित्वाच्या खुणा ठेवलेल्या दिसल्या. तसेच, महापुराची लक्षणे यानाजवळच्या दगडधोंड्यांच्या भागात दिसत आहेत. प्राणवायुविरहित वातावरणात,

चुंबकीय धुळीचे अस्तित्व स्पष्ट दिसते. यान उतरलेल्या भागात म्हणजे, मंगळाच्या उत्तर गोलार्धात सध्या उन्हाळा चालू आहे. तेथे दिवसा आठ अंश फॅरनहाअिट व रात्री उणे १७० अंश फॅरनहाईट एवढे कमी तापमान आढळले. मंद वाऱ्याची सकाळ-संध्याकाळची दिशा, दुपारी बदलत असल्याचे निरीक्षण आठवड्याभरात केले गेले, तसेच दिवसापेक्षा रात्री जास्त वेगाने वारे वाहात असल्याचे दिसले. मंगळाभोवती धुळीचे वातावरण असल्याने अवकाश स्वच्छ व स्पष्ट दिसू शकले नाही. ही धूळ पस्तीस टक्के सूर्यप्रकाश शोषत असावी. रात्री घेतलेल्या छायाचित्रात 'डेमोस'नावाचा चंद्र धूसर व तांबूस रंगाचा दिसला. गेले जवळजवळ चार महिने 'मार्स पाथ फाईंडर'ची बग्गी व मुख्य यान मंगळावरून संदेश पाठवत आहे.

याच काळात 'मार्स ग्लोबल सर्व्हेयर' यानाने मंगळाच्या वातावरणात प्रवेश केला. अकरा सप्टेंबर रोजी हे यान, मंगळाच्या गुरुत्वाकर्षणामुळे मंगळाभोवती फिरू लागले. मंगळाभोवतालच्या वातावरणामुळे यानाला ब्रेक लागल्यासारखे होऊन त्याचा वेग मंदपणे कमी होऊ लागला. जवळ जवळ चार महिने हे यान, मंगळाभोवती फिरत राहून त्याचा वेग व उंची कमी राहणार आहे. शेवटी ३८० कि.मी. उंचीवर पोहोचल्यावर यान आपले नियोजित काम सुरू करेल. दर दोन तासाला एक, अशी मंगळ प्रदक्षिणा करताना ग्लोबल सर्व्हेयर, मंगळाचे सर्वांगीण फोटो घेणे चालू करेल. हे काम, १५ मार्च ९८ रोजी सुरू होऊन, ३१ जानेवारी २००० साली संपेल. या काळात, मंगळाच्या दऱ्या-खोऱ्यांची उंची, वातावरणातील ढगांची सखोल माहिती, तसेच मंगळावरील पाणी, हवेचा दाब व त्यातील घटकांची सखोल माहितीदेखील गोळा करून पृथ्वीकडे पाठविली जाईल. 'थर्मल एमिशन स्पेक्ट्रोमीटर' नावाचे उपकरण वापरून, मंगळावरील दगड व मातीचे विश्लेषण केले जाईल. 'लेसर' वापरून, दऱ्या-खोऱ्यांची उंची मोजली जाईल व 'मॅग्नेटोमीटर किंवा इलेक्ट्रॉन रिफ्लेक्टोमीटर' या प्रकारची यंत्रणा वापरून मंगळावरील चुंबकीय शक्तीचा शोध घेतला जाईल.

रशियाने सोडलेले 'मार्स ९६' यान मात्र मंगळ दौऱ्यात अयशस्वी ठरले. या यानाच्या रॉकेटसच्या बिघाडामुळे हे यान, पृथ्वीच्या कक्षेबाहेर न जाता पृथ्वीवरच कोसळले. अमेरिकेची दोन याने मंगळाचा सर्वांगीण अभ्यास या दोन वर्षात करतील. त्यानंतर डिसेंबर ९८ व जानेवारी ९९ मधे, 'सर्व्हेयर ९८' नावाची दोन याने पुन्हा मंगळाकडे झेपावतील. अशा मोहिमांचा अनुभव जमवून २००५ साली मंगळावर यान उतरवून बग्गीच्या साहाय्याने तेथील दगडमाती गोळा करून, ते पृथ्वीवर परत आणण्याचा प्रयोग केला जाईल. या प्रकारच्या मोहिमेच्या यशानंतर रोबो किंवा प्रत्यक्ष मानव मंगळावर उतरवण्याचा प्रयोग आखण्याची स्वप्ने नासाचे शास्त्रज्ञ पाहात आहेत. आपण त्यांच्या सर्व मोहिमांना सुयश चिंतूया.

●●

डॉ. प्रकाश तुपे
८४१ सदाशिव पेठ, पुणे ३०.

## साहसी बालक पुरस्कार

दरवर्षी आपल्या प्रजासत्ताक दिनी म्हणजेच २६ जानेवारीला, शौर्य व साहस दाखविणाऱ्या बालकांना अखिल भारतीय बाल कल्याण समिती, दिल्लीतर्फे विशेष पुरस्कार दिले जातात. अत्यंत जोखमीची, शौर्याची कामगिरी करणाऱ्या बालकाला, रोख पाच हजार रुपयांचा 'भरत पुरस्कार' दिला जातो. रोख रकमेबरोबरच सुवर्णपदक व प्रमाणपत्राचाही या पुरस्कारात समावेश आहे. दिल्लीतील एक लष्करी अधिकारी १९७८ सालापासून आपल्या मुलांच्या स्मरणार्थ, हे दोन पुरस्कार देतात. संजय आणि गीताला दोन गुंडांनी निर्घुणपणे ठार केले. त्याप्रसंगी संजय व गीताने आपल्या सुटकेसाठी अत्यंत शौर्याने लढा दिला. परंतु त्यात त्यांना अपयश आले. धाडसी मुलामुलींसाठी ही पारितोषिके आहेत.

इतरही शूर मुलांना वीरता पुरस्कार दिले जातात. या सर्वांची, दिल्लीतील २६ जानेवारीच्या गणतंत्र दिनाच्या समारंभात हत्तीवरून मिरवणूक काढली जाते. सर्व पुरस्कार विजेत्यांना पुढील शिक्षणासाठी दरमहा ३००/- रुपयांची शिष्यवृत्ती दिली जाते.

# फेब्रुवारी महिन्यातील कार्यक्रम

**नावीन्यपूर्ण स्पर्धांचे आयोजन :** निबंध, वक्तृत्व, चित्रकला, नृत्य, गायन, फॅशन शो, फॅन्सी ड्रेस इ. सारख्या स्पर्धांना ऊत आला आहे. स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना व्यक्त करण्याची, विकसित करण्याची संधी मिळते; पण बहुतांश वेळेला तेच तेच विद्यार्थी स्पर्धांमध्ये सहभागी होताना दिसतात. म्हणून आपण पूर्णत: नवीन स्पर्धा घेऊन अनेक नवीन विद्यार्थ्यांना, गावातील विविध वयोगटातील व्यक्तींना भेटून, त्यांच्याशी याबाबत चर्चा करण्यास सांगावे. खऱ्या अर्थाने त्यांच्यामधील विविध बौद्धिक क्षमतांना व्यक्त होण्याची संधी मिळवून द्यावी. त्यासाठी उदाहरणादाखल खाली काही स्पर्धा दिल्या आहेत. त्यापैकी कोणतीही एक स्पर्धा आयोजित करावी. त्याचे परीक्षणाचे निकष, परीक्षक, इ. आकर्षक बक्षीस ठरवावे. शाळा - शाळांशी व सभासदांशी संपर्क करून, नेहमी मागे राहणाऱ्या विद्यार्थ्यांनाही यामध्ये सहभागी होण्यास विशेष प्रोत्साहन द्यावे.

**नमुन्यादाखल स्पर्धांचे विषय**

*** मुलाखत घेण्याची स्पर्धा * मुलांसाठी पाककृतीची स्पर्धा * दिलेल्या कवितेला चाल लावण्याची स्पर्धा**
*** दिलेल्या चालीवर, विषयावर कविता करण्याची स्पर्धा * एखाद्या पुस्तकाचा परिचय लिहिण्याची स्पर्धा**
*** एखाद्या विषयावर कात्रणांचा संग्रह तयार करण्याची स्पर्धा, इ.**

स्पर्धा सांघिक/ वैयक्तिक घेता येतील. स्पर्धेच्या संयोजनामध्ये काही अडचणी वाटल्यास छात्र प्रबोधनशी पत्रव्यवहार करावा.


# 'छात्र प्रबोधन'ची स्थानिक कार्यालये

**निगडी** : ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, पेठ क्र. २५, निगडी, पुणे ४४. ☎ ७८४३८०
**सोलापूर** : ज्ञान प्रबोधिनी, बाल विकास मंदिर, डफरिन चौक, सोलापूर. ☎ ६२५७८२
**सातारा** : श्री. सतीश कुलकर्णी, प्लॉट नं. ५१, सर्व्हे नं.३२७/१अ, अंजली कॉलनी, करंजे तर्फे, सातारा. ☎ ५०५०४
**सांगली** : श्री. शैलेंद्र केळकर, ६९२ गावभाग, खाडिलकर गल्ली, सांगली. ☎ ३३१३८२
**कोल्हापूर** : डॉ. शुभांगी कुलकर्णी, आशीर्वाद हॉस्पिटल, बिनखांबी गणेश मंदिराजवळ, कोल्हापूर. ☎ ५२१५३४
**इचलकरंजी**: श्री विनायक गद्रे, वॉर्ड नं. ५, घर नं. ६७ अ, झेंडा चौक, इचलकरंजी. ☎ ४२४००८
**नाशिक** : सौ. साधना गाडगीळ, रामकृष्णधाम, श्रीरामवाडी, म. गांधी रस्ता, नाशिक. ☎ ५७४८३०
**ठाणे** : डॉ. अजित दातार, बी २० अहिल्या सोसा., घंटाळी रस्ता, ठाणे (प.) ☎ ५४२१०८७
**डोंबिवली** : सौ. सविता सुनील ढोणसळे, बी-१३ कॉमेटकुंज को. हौ. सो., टिळकनगर शाळेजवळ, डोंबिवली(पू.) ☎ ४५४६८८
**बोरिवली** : सौ.अर्चना अशोक साठे, साठे हाऊस, क्रॉसरोड नं. २, बोरिवली(पू.) ☎ ८०६०२४१
**पार्ले** : सौ. वसुंधरा भोसले, 'त्रिमूर्ती' प्लॉट नं. ३९, तेजपाल स्कीम, रोड नं. ३, विलेपार्ले (पू.) ☎ ८२०४०७६
**अलिबाग** : श्री.तुषार साखळकर, 'सहयोग', श्रीबाग नं २, अलिबाग. ☎ २४६०३
**रत्नागिरी** : सौ. अंजली कार्लेकर, लक्ष्मीबाई लिमये चाळ, जोशी पाळंद, रत्नागिरी. ☎ २०७२४
**धुळे** : सौ. उषा पाठक, धुळे अर्बन बँक, गरूडबाग, धुळे.
**परभणी** : श्री. दिलीप राके, 'पारस' नाथनगर, परभणी.
**लातूर** : डॉ. अरूणा देवधर, विद्यानगर, विवेकानंद रुग्णालय, लातूर. ☎ ४३६१४
**औरंगाबाद** : सौ. स्वाती पळसकर, सनी कॉर्नर, दुसरा मजला, पैठण गेट, औरंगाबाद. ☎ २३३२६

**महाराष्ट्रातील इतर गावांमध्ये छात्र प्रबोधनची स्थानिक कार्यालये स्वयंसेवी वृत्तीने सुरू करण्याची इच्छा असलेल्यांनी कार्यालयाशी पत्रव्यवहार करावा.**

या कार्यालयांमध्ये 'छात्र प्रबोधन' या मासिकाची व 'प्र'शिक्षक या द्वैमासिकाची वर्गणी भरून सभासद होता येईल. ज्ञान प्रबोधिनीद्वारा विविध पुस्तके विक्रीसाठी उपलब्ध असतील. छात्र प्रबोधन वा 'प्र' शिक्षकांसाठी आपले लेखन या केंद्रावर आपण देऊ शकाल. छात्र प्रबोधनद्वारा होणाऱ्या विविध शिबिरांची व उपक्रमांची माहिती येथे उपलब्ध असेल व त्यासाठी नावनोंदणी तेथे करता येईल.


हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक प्रा. महेंद्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर ११ पौष शके १९१९, १ जानेवारी १९९८ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातुबाग, पुणे येथे छापून ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथून प्रसिद्ध केले.



रील हे चित्र निळ्या व लाल जिलेटिन कागदाच्या चष्म्यातून त्रिमितीयुक्त दिसेल.



नोंदणी क्रमांक : PHM/22/VIII/1997, टपाल नोंदणी क्र. छात्र प्रबोधन; PNCW/349, तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्र.- L 128



# हे वीर विवेकानंद...

हे वीर विवेकानंद हिंदुयशमूर्ती
हे युवकप्रवर तू युवहृदयांची स्फूर्ती ॥ध्रु.॥

दास्यात पाहुनी विश्वधर्मजननी ही
तू क्षुब्ध सिंहसा व्याकुल अंतर्यामी
मुक्तीचा तिचिया ध्यास तुला दिनराती ॥१॥

शत आघातांनी कुंठित मूर्च्छित झाली
ती हिंदुचेतना फिरून तू चेतविली
तिज उन्नत मस्तक निर्भय केले जगती ॥२॥

स्मरतात तुझे ते घनगर्जितसे शब्द
'मन वज्र हवे अन् मनगट ते पोलाद'
जग जिंकायाची ईर्ष्या दाटो चित्ती ॥३॥

तव अमृतवाणी हाक देत आम्हाते
रे अतुल बलस्वी करू हिंदुराष्ट्राते
युवशक्ति हवी मज कार्यशरण पुरुषार्थी ॥४॥

स्थापावा त्यांनी धर्म आत्म अर्पूनी
त्यानेच अर्चना होत राष्ट्रदेवाची ॥५॥


**संपर्क पत्ता :**
संपादक, छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ,
पुणे 411030 ☎ (०२१२) ४७७६९१, ४७८०९५
**कार्यालयाची वेळ :** स. १० ते संध्या. ७
**या अंकाची किंमत :** रु. १०/-
**वार्षिक वर्गणी :** रुपये १२५/-
**प्रकाशन दिनांक :** राष्ट्रीय सौर पौष ११ शके १९१९
१ जानेवारी १९९८